

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक ३०९ * नांदेड * शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

पायाभूत सुविधांच्या निर्मितीतून जनतेला दर्जेदार सेवा देण्यावर भर -उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि विकसित उद्यान नागरिकांच्या सेवेत दाखल

कंधार (प्रतिनिधी)– कंधारच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाची नवीन इमारत, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि स्वर्गीय शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर उद्यानाचे लोकार्पण शुक्रवारी झाले. इतिहासाचा अभिमान बाळगतानाच भविष्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे, हीच विकासाची खरी संकल्पना आहे. या माध्यमातून जनतेला दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शुक्रवारी कंधार येथे केले.

कंधार येथील विविध विकासकामांच्या उद्घाटनानंतर श्री शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर आयोजित जाहीर कार्यक्रमात उपमुख्यमंत्री श्रीमती पवार बोलत होत्या. या कार्यक्रमाला सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आ. प्रताप पाटील चिखलीकर, खा. रवींद्र चव्हाण, आ. बालाजी कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता रुपा राऊळ, उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, लोहा नगराध्यक्ष शरद पवार, प्रवीण पाटील चिखलीकर, कंधार नगराध्यक्ष शहाजी नळगे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, मधुकर डांगे, किशनराव डफडे, बाबुराव केंद्रे, माजी जि. प.सदस्य बाबुराव गिरे, गणेशराव सावळे, स्वप्निल लुंगारे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, श्रेणीवर्धित १०० खाटांच्या नवीन उपजिल्हा रुग्णालय इमारतीमुळे कंधार आणि परिसरातील नागरिकांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयाची इमारत आधुनिक होण्यासोबतच आरोग्यसेवाही दर्जेदार व्हावी, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत आणि गरीब रुग्णांना सन्मानाने व आपुलकीने वागणूक मिळावी, यासाठी आरोग्य यंत्रणेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळजीपूर्वक काम करावे, अशी सूचना त्यांनी केली. तसेच, उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या नव्या इमारतीतून लोकाभिमुख कामकाज होऊन सामान्य नागरिकांचे प्रश्न तातडीने सुटावेत, त्यांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत आणि वेळेत सेवासुविधांसह सन्मानाची वागणूक मिळावी, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी व्यक्त केली.





राज्यातील बहुतांश भागांत कमी पाऊस झाल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची राज्य शासनाने गांभीर्याने दखल घेतली आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना एकटे न सोडता शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. तातडीच्या मदतीसोबतच दीर्घकालीन उपाययोजनांवर भर दिला जात असून, त्यासाठी जलसंधारणाची कामे, पाणी साठवण, भूजल पातळी वाढवणे आणि पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन यावर शासनाचा विशेष भर राहील. या परिस्थितीत शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी आणि पशुधन यापैकी कोणालाही वाऱ्यावर सोडले जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिली.

आ. चिखलीकरांना रडू कोसळले!

श्री शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर मोठा जनसमुदाय जमला होता. आपण अनेक पक्ष बदलले पण जनतेनी मला साथ दिली, याचे उपकार मी कधीच विसरणार नाही असे सांगताना माझ्या अडीअडचणीत स्व. अजितदादांनी मोठी मदत केली, भावासारखे प्रेम दिले. त्यांच्या निधनाने आपण पोरके झालो अशा भावना मांडताना आ. प्रतापराव पाटील यांना अश्रू आवरले नाहीत. उपस्थित मोठा जनसमुदाय स्तब्ध झाला. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनाही यावेळी अश्रू अनावर झाल्याचे दिसून आले.

पाणीटंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे तातडीने पाणीपुरवठा करण्याचे निर्देश

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यात संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचे सावट लक्षात घेता राज्य सरकार आता अलर्ट मोडवर आले आहे. ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, तिथे कोणताही विलंब न करता तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, असे स्पष्ट आदेश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रशासकीय यंत्रणांना दिले आहेत.

इतकेच नव्हे तर, प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या पाणीटंचाईच्या बातम्यांचीही अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी, संबंधित गावात प्रत्यक्ष जाऊन पाहणी करावी आणि गरज भासल्यास तात्काळ टँकर सुरू करावेत, अशा सूचनाही मंत्री गुलाबराव पाटील यांनी केल्या आहेत. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावांतील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने तत्परतेने पावले उचलावीत. इतकंच काय तर ज्या गावांमध्ये पाण्याचे स्रोत आटले आहेत किंवा पुरेसा पाणीपुरवठा होत नाही, तिथे टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे आणि गरजेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

राज्यावर घोंघावणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने यापूर्वीच जिल्हा प्रशासनाला कंबर कसण्याचे आणि ठोस नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. केवळ अंदाजांवर विसंबून न राहता पावसाचे एकूण प्रमाण, खालावलेली भूजल पातळी, विहिरींची सद्यस्थिती आणि धरणांमधील उपलब्ध पाणीसाठा या सर्व घटकांचा सखोल अभ्यास करून टंचाईग्रस्त गावांची यादी तातडीने निश्चित करावी, अशा स्पष्ट सूचना मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिल्या आहेत.

सोन्याच्या दरात मोठी घसरण; एका दिवसात १८१६० रूपयांनी स्वस्त

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– भारतात आणि आंतरराष्ट्रीय बाजारात गेल्या एका महिन्यात सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. गेल्या एका महिन्यात सोन्याचा दर १८१६० रुपयांनी कमी झाला आहे. दुसरीकडे एक किलो चांदीचा दर ६२७७० रुपयांनी घसरला आहे.

बुलियन मार्केटमध्ये १९ ऑक्टोबरला २४ कॅरेट सोन्याचा दर १,४७,५७० रुपये प्रति तोळा म्हणजेच १० ग्रॅम होता. १९ नोव्हेंबरला सोन्याचा दर १,२९,४१० रुपयांवर आला आहे, म्हणजेच एक तोळे सोने१८,१६० रुपयांवर आला आहे. लग्न सराईचा हंगाम आता सुरु होत आहे. ज्यामुळं ज्यांना दागिने खरेदी करायचे आहेत त्यांना सोने दरातील घसरणीमुळं दिलासा मिळू शकतो. तर, सोने दरातील घसरणीमुळं सोन्यात गुंतवणूक करणाऱ्यांना मात्र मोठा फटका बसला आहे.

शासन दुष्काळात सर्वांसोबत आहे; नांदेडमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची ग्वाही; पाणी, चारा आणि रखडलेल्या प्रकल्पांवर दिले तातडीचे आदेश

नांदेड (प्रतिनिधी)– राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार नांदेड दौऱ्यावर आल्या होत्या. यावेळी त्यांनी शासन दुष्काळात सर्वांसोबत असल्याची ग्वाही दिली. तसेच पाणी, चारा आणि रखडलेले प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याचे अदेश दिले.

पुढे उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, मी दुष्काळी आढावा घेतला आहे. सर्व अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. शासन दुष्काळात सर्वांसोबत असेल. पाणी, चारा याचे नियोजन केले जात आहे. याचा मी स्वतः आढावा घेणार आहे.

शासनाच्या नियमाप्रमाणेच पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये, यासाठी धरण आणि तलाव निहाय सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील रखडलेले प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याचे आदेशही त्यांनी दिले. जिल्ह्यात भूजल पातळी वाढविण्यासाठी जलतारा प्रकल्प उभारण्यासाठी सुरुवात झाली असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच २०० फुटांपेक्षा जास्त खोल बोअरवेल खोदण्यावर बंदी घातल्याचे त्यांनी सांगितले.

चारा प्रश्नासाठी ३ कोटी रुपये मंजूर असून आतापर्यंत १४ हजार शेतकऱ्यांना चारा वाटप करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी चारा पिके घ्यावीत, असे आवाहनही सुनेत्रा पवार यांनी यावेळी केले.

नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी कंधार येथील शांतिदूत गोविंदराव पाटील उद्यानाच्या लोकार्पण कार्यक्रमातही सहभाग घेतला.

राज्यातील चार वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई (प्रतिनिधी)– राज्य शासनाने शुक्रवारी चार वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या (आयएएस) बदल्यांचे आदेश जारी केले. यामध्ये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांच्यासह चार अधिकाऱ्यांकडे नव्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत.

शुक्रवारी झालेल्या बदल्यांमध्ये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत असलेल्या अशोक वामन काकडे यांची मंत्रालयातील दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे सदस्य सचिव म्हणून कार्यरत असलेल्या प्रवीण कुंडलिक पुरी यांची महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सचिवपदी नियुक्ती झाली आहे.

गुलाब राजाराम खरात यांची महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री सचिवालयातील मुख्य सचिव कार्यालयात सहसचिव म्हणून कार्यरत असलेल्या मकरंद प्रल्हाद देशमुख यांची मुंबईतील राज्य कर विभागाच्या सहआयुक्तपदी बदली करण्यात आली आहे.

राजस्थान जिल्हा परिषद, निवडणुकीत काँग्रेसची लाट, जयपूरमध्येही भाजपचा पराभव

जयपूर (प्रतिनिधी)– राजस्थानमधील स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत भाजपचा मोठा पराभव झाला आहे. काँग्रेसच्या लाटेत भाजपचा दोन तृतियांशपेक्षा अधिक जागांवर पराभव झाला आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपचा पराभव झाला आहे. ३७ जिल्हा परिषदेच्या मतमोजणीत काँग्रेसनं २७ जिल्हा परिषदेत विजय मिळवला आहे. तर जयपूरच्या ५७ जागांपैकी भाजपला केवळ १२ जागांवर विजय मिळवता आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यातून आरोपी पळाला! पोलिसांची दमछाक

इतवाऱ्यातून पुन्हा मुसक्या आवळल्या



नांदेड (प्रतिनिधी)– ताब्यात असलेल्या एका आरोपीने ग्रामीण पोलीस ठाण्यात गळफास घेतल्याच्या घटनेची सीआयडी स्तरावरून चौकशी सुरू असतानाच त्या घटनेतून काहीही बोध घेतला नसल्याचे दिसून येत आहे. चोरीच्या गुन्ह्यातील एका आरोपीने पलायन केल्याची घटना शुक्रवार दि. २० नोव्हेंबर रोजी घडली. आरोपी पळून गेल्याचे समजताच पोलिसांची एकच धावपळ होऊन गोंधळ उडाला.

नांदेड ग्रामीण पोलिसांनी एका चोरीच्या गुन्ह्यातील शेख शोएब उर्फ शहेनशहा शेख मोईन (वय २२ रा. हनुमान मंदिराजवळ वाजेगाव) नावाच्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या होत्या. त्या आरोपीला कोर्टात नेण्यासाठी ठाणे स्तरावर कायदेशीर प्रक्रिया सुरू होती. प्रक्रिया सुरू असतानाच आरोपीने ठाण्यातून पलायन केले.

आरोपी दिसत नसल्याचे पाहून पोलिसांनी ठाणे परिसरात प्रचंड शोधाशोध केल्यानंतरही तो सापडला नाही. अखेर पळून गेलेला आरोपी इतवारा परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांच्या एका पथकाने जाऊन सापळा रचत त्याला ताब्यात घेतले. काही तासांनंतर आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले असले तरी सदर घटनेने पोलिसांच्या निष्काळजीपणाची चर्चा रंगली आहे.

काही दिवसांपूर्वी आरोपीने गळफास घेतल्याची घटना ग्रामीण ठाण्यात घडली होती. त्या 'डेथ इन कस्टडी' ची सध्या सीआयडी चौकशी करत आहे. या घटने पाठोपाठ भाग्यनगर ठाण्यात सोलापूर भागातून पकडून आणलेल्या एका तरुणाने उपस्थित पोलिसांना चकवा देत ठाण्याच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारली होती. त्यात तो जखमीही झाला होता. त्यापूर्वी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हे शोध पथकाच्या ताब्यातूनही दोन आरोपींनी पलायन केले होते.

सदर दोन्ही घटनांमुळे 'ठाणे स्तरावर चाललं तरी काय?' असा प्रश्न उपस्थित केला जात होता. त्यातच आता ही तिसरी घटना घडल्याने सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

विष्णुपुरी प्रकल्पाच्या पाईपलाईनमधून पाण्याची प्रचंड नासाडी!

ऐन दुष्काळात सिडको रोडवर नदीसारखा प्रवाह, लाखो लिटर पाणी रस्त्यावर

नांदेड (प्रतिनिधी)– येथील गोदावरी नदीवर असलेल्या विष्णुपुरी प्रकल्पाच्या मुख्य पाईपलाईनमधून पाण्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ४.२८ वाजता सिडको रोड, म्हाडा कॉलनी, लातूर रोड परिसरात हा प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आहे.


विष्णुपुरी प्रकल्पातून नांदेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईपलाईनला गळती लागल्याने पाणी कारंज्यासारखे उसळून रस्त्यावर वाहत आहे. त्यामुळे उड्डाणपुलाखालील संपूर्ण सिडको रोड जलमय झाला असून रस्त्याला नदीचे स्वरूप आले आहे. गुडघाभर पाण्यातून वाहने जाताना दिसत आहेत.

एकीकडे नांदेड जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती असून ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवण्यासाठी महापालिकेकडून नियोजन केले जात आहे. तर दुसरीकडे विष्णुपुरी प्रकल्पाच्या पाईपलाईनमधून तासन्तास लाखो लिटर शुद्ध पिण्याचे पाणी वाया जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या साचलेल्या पाण्यातून एस.टी. बस, ट्रक, कंटेनर यांना वाट काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्यावरील खड्डे पाण्याखाली गेल्याने दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. तसेच घाण पाणी साचल्याने रोगराई पसरण्याची भीतीही नागरिक व्यक्त करत आहेत.

विष्णुपुरी प्रकल्पाच्या पाईपलाईनची गळती तातडीने थांबवून दुरुस्ती करावी, पाण्याची नासाडी थांबवावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.





भोकर तालुक्यातील दत्तक गाव जांभळीतील ग्रामस्थांची रोजगारासाठी तेलंगणाकडे धाव

भोकर (प्रतिनिधी)– भोकर तालुक्यातील जांभळी हे गाव माजी आमदार अमिता चव्हाण यांच्या कार्यकाळात दत्तक घेण्यात आले होते. मात्र, गावात मूलभूत सुविधा आणि रोजगाराचा प्रश्न कायम असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. रोजगाराच्या शोधात गावातील ११ कुटुंबे तेलंगणा राज्यातील मंचिरियाल येथे स्थलांतरित होत आहेत.

भोकर परिसरात औद्योगिक वसाहतीसाठी जागा उपलब्ध असली, तरी तिथे अद्याप मोठे प्रकल्प सुरू झालेले नाहीत. परिणामी, रोजगारासाठी अनेक कुटुंबांना मुंबई, पुणे या शहरांसह परराज्यात जावे लागते.



कुटुंबांसोबत स्थलांतर करावे लागत असल्यामुळे लहान मुलांच्या शिक्षणात खंड पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उदरनिर्वाहासाठी बाहेर जावे लागत असल्याने शिक्षणाचा प्रश्न दुय्यम ठरत असल्याचे चित्र ग्रामस्थांनी मांडले. गावात रोजगाराचा अभाव अन् त्यातच दुष्काळाची स्थिती यामुळे ग्रामस्थांवर स्थलांतराची वेळ आली आहे.

स्थानिक पातळीवर रोजगार, पाणीपुरवठा आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून स्थलांतर थांबवण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

गावात रोजगार आणि पाण्याची समस्या आहे. पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी आम्हाला मंचिरियालला जावे लागत आहे. गाव दत्तक घेतले असले, तरी आमच्या समस्या अद्याप सुटलेल्या नाहीत.

–लक्ष्मण किशन आडे, स्थलांतरित ग्रामस्थ

आता पोलीस भरतीच्या तरुणींना शारीरिक चाचणीसाठी मुदतवाढ

मुंबई (प्रतिनिधी)– पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणींना ऐन शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळी आली म्हणून आता तरुणींची संधी हुकणार नाही. अशा तरुणींना आरोग्य तपासणीनंतर पाच ते सहा दिवसांची मुदतवाढ दिली जाणार आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी ही घोषणा केली आहे.

महिनोन्महिने मैदानावर घाम गाळायचा, धावण्याचा सराव करायचा, पोलीस होण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीवाचं रान करायचं पण ऐन शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळी आली आणि पोटात कळा सुरू झाल्या, कंबरदुखी किंवा अशक्तपणामुळे धावता आलं नाही, तर मेहनतीवर पाणी फिरण्याची भीती अनेक मुलींना असते. मात्र, आता अशा तरुणींसाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे.

मासिक पाळीच्या काळात काही तरुणींना तीव्र पोटदुखी, कंबरदुखी, थकवा, अशक्तपणा आणि चक्कर येण्याचा त्रास होतो. अशा परिस्थितीत १०० मीटर आणि ८०० मीटर धावणं, गोळाफेक किंवा लांब उडीसारख्या शारीरिक चाचण्या देताना अडचणी येऊ शकतात. प्रत्येक मुलीला होणारा त्रास वेगवेगळा असतो. पण ऐन परीक्षेच्या दिवशी हा त्रास झाला तर कामगिरीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. मासिक पाळीदरम्यान शरीरात बदल होतात. या काळात धावण्याच्या क्षमतेवर किती परिणाम होतो. अशा वेळी मुलींनी काळजी घ्यावी लागते, असे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अपूर्वा देशपांडे यांनी सांगितले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

महासत्तांची मैत्री: आशियातील शांततेची नवी पहाट!

जगाच्या राजकारणात मैत्री आणि शत्रुत्व यांचे समीकरण कधीही कायमस्वरूपी नसते. कालपर्यंत एकमेकांकडे संशयाने पाहणाऱ्या महासत्ता जागतिक हितासाठी एकाच व्यासपीठावर येतात, तेव्हा त्याचे पडसाद संपूर्ण जगात उमटतात. अमेरिका, रशिया आणि चीन या तीन बलाढ्य राष्ट्रांच्या नेत्यांमधील एकत्रित चर्चा हा त्याच दृष्टीने महत्त्वाचा घटनाक्रम मानावा लागेल. चीनचे अध्यक्ष झी जिनपिंग यांनी या बैठकीचे स्वागत करताना तिला मैलाचा दगड म्हटले, तर रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी जागतिक शांतता आणि आंतरराष्ट्रीय स्थिरता राखण्याची तिन्ही देशांची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली. महासत्तांच्या या एकत्र येण्यामुळे जागतिक राजकारणात संघर्षाऐवजी सहकार्याचे नवे पर्व सुरू होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने शीतयुद्धाचा काळ अनुभवला. अमेरिका आणि रशिया यांच्यातील सत्तासंघर्षाने जगाला अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवले होते. त्यानंतर चीनचा महासत्ता म्हणून झालेला उदय आणि अमेरिकेशी वाढलेली आर्थिक व सामरिक स्पर्धा यामुळे जागतिक राजकारण अधिक गुंतागुंतीचे बनले. आज युक्रेन युद्ध, तैवानचा प्रश्न, मध्यपूर्वेतील अस्थिरता, व्यापारयुद्ध आणि अण्वस्त्रांची स्पर्धा अशा अनेक संकटांनी जगाला वेढले आहे. अशा परिस्थितीत तीन महासत्तांच्या नेतृत्वाने एकत्र बसून शांततेचा विचार करणे ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. विशेषतः चीन आणि रशिया यांच्यातील वाढती जवळीक आशिया खंडाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकते. या दोन्ही देशांचे भौगोलिक, आर्थिक आणि सामरिक हितसंबंध आशियाशी जोडलेले आहेत. मध्य आशिया, पूर्व आशिया आणि प्रशांत महासागर परिसरातील राजकारणावर या दोन्ही देशांचा मोठा प्रभाव आहे. चीन आणि रशिया यांनी परस्परांतील विश्वास अधिक दृढ करून सहकार्याचा मार्ग स्वीकारला, तर आशियातील अनेक प्रादेशिक संघर्ष कमी करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. भारतासह आशियातील अन्य देशांनाही स्थैर्यपूर्ण वातावरणाचा लाभ मिळू शकतो. मात्र, ही मैत्री कोणत्याही तिसऱ्या देशाविरुद्धचे सामरिक समीकरण न बनता सर्वसमावेशक शांततेचा आधार ठरली पाहिजे. असे असले तरीही कट्टरपंथी आणि मानवतेचे शत्रू पाकिस्तान आणि बांगलादेश यांची नांगी ठेचणं शांततेच्या दृष्टीने तेवढेच महत्त्वाचं आहे. पुतीन यांनी तिन्ही देश केवळ दुसऱ्या महायुद्धातील विजेते म्हणून नव्हे, तर जागतिक शांततेची समान जबाबदारी स्वीकारणारे देश म्हणून एकत्र आल्याचे सांगितले. त्यांच्या या विधानाला विशेष महत्त्व आहे. कारण महासत्तांकडे केवळ आर्थिक सामर्थ्य किंवा लष्करी ताकद नसते, तर त्यांच्या निर्णयांचा परिणाम जगातील कोट्यवधी नागरिकांच्या जीवनावर होत असतो. त्यामुळे या देशांनी आपापले वर्चस्व सिद्ध करण्यापेक्षा जागतिक शांतता टिकविण्यासाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही अण्वस्त्रांचा प्रश्न उपस्थित करून जगातील अण्वस्त्रांची संख्या कमी करण्याची आणि त्यांचा वापर कधीही होऊ नये यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता व्यक्त करून कधी नव्हे ती प्रथमतःच पोक्त मनोगत व्यक्त केले. आज जगाकडे असलेली अण्वस्त्रे मानवजातीच्या अस्तित्वालाच आव्हान देऊ शकतात. अमेरिका आणि रशिया यांच्याकडे मोठ्या प्रमाणात अण्वस्त्रे आहेत, तर चीनही आपली अण्वस्त्र क्षमता वाढवत आहे. या पार्श्वभूमीवर तिन्ही देशांनी पारदर्शक अण्वस्त्र नियंत्रण करार, शस्त्रस्पर्धेवर मर्यादा आणि अण्वस्त्रांचा प्रथम वापर टाळण्यासारख्या उपायांवर गंभीर चर्चा करणे आवश्यक आहे. असे असले तरीही शांततेच्या घोषणा प्रत्यक्ष कृतीत उतरल्या तरच त्यांना अर्थ प्राप्त होईल अन्यथा हे सर्व 'बोलाचाच भात अन् बोलाचीच कढी' ठरेल. चीनने तैवानचा मुद्दा उपस्थित करून अमेरिकेने या प्रश्नावर योग्य भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. दुसरीकडे, युक्रेनचा मुद्दा चर्चेत आणण्याचा अमेरिकेचा प्रयत्न चीनने टाळल्याचे वृत्त आहे. यावरून महासत्तांमधील मतभेद अद्याप कायम असल्याचे स्पष्ट होते. मात्र, मतभेद असणे आणि त्यातून संघर्ष निर्माण होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. कोणत्याही देशाच्या सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर राखून संवादातून प्रश्न सोडविण्याची तयारी असणे अधिक महत्त्वाचे आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारताची भूमिकाही महत्त्वाची ठरते. भारताचे रशियाशी ऐतिहासिक मैत्रीपूर्ण संबंध आहेत, तर अमेरिका आणि चीन या दोन्ही देशांशी भारताचे आर्थिक व सामरिक हितसंबंध जोडलेले आहेत. त्यामुळे चीन-रशिया सहकार्यामुळे आशियात शांतता निर्माण झाली, तर भारताच्या विकासासाठीही पोषक वातावरण तयार होऊ शकते. भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद, पाकिस्तानशी संबंधित सुरक्षा आव्हाने आणि हिंद-प्रशांत क्षेत्रातील सामरिक स्पर्धा यांसारखे प्रश्न सोडविण्यासाठीही शांततापूर्ण वातावरण उपयुक्त ठरेल. जगाला आज आणखी एका शीतयुद्धाची नव्हे, तर सहकार्याच्या नव्या पर्वाची आवश्यकता आहे. महासत्तांनी शस्त्रास्त्रांच्या साठ्यापेक्षा अन्न, आरोग्य, शिक्षण, हवामान बदल आणि दारिद्र्य निर्मूलनावर अधिक संसाधने खर्च केली पाहिजेत. चीन आणि रशिया यांनी एकत्र येऊन आशियात शांतता व स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि अमेरिकेनेही त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, हीच अपेक्षा आहे. महासत्तांच्या मैत्रीचा लाभ केवळ त्यांच्या सत्ताकारणाला नव्हे, तर सामान्य माणसाच्या सुरक्षित आणि शांततापूर्ण जीवनाला झाला पाहिजे. कारण, जगाचे भवितव्य कोणत्या देशाकडे किती अण्वस्त्रे आहेत यावर नव्हे, तर किती देश परस्परांवर विश्वास ठेवतात यावर अवलंबून आहे. चीन, रशिया आणि अमेरिका यांची ही एकत्रित चर्चा केवळ छायाचित्रांपुरती किंवा राजनैतिक औपचारिकतेपुरती मर्यादित राहू नये. विशेषतः चीन आणि रशियाच्या मैत्रीमुळे आशिया खंडात संघर्षाचे ढग दूर होऊन शांततेची नवी पहाट उजाडावी. महासत्तांनी वर्चस्वाच्या राजकारणाऐवजी सहअस्तित्वाचा मार्ग स्वीकारला, तरच 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरेल.

पंढरीची वारी : भक्तीच्या वाटेवर समतेचा जागर



आषाढी असो वा कार्तिकी, पंढरीच्या दिशेने निघालेल्या वारकऱ्यांच्या पावलांत एक विलक्षण चैतन्य असते. डोक्यावर तुळशीवृंदावन, खांद्यावर भगवी पताका, ओठांवर विठ्ठलनामाचा गजर आणि मनात पांडुरंगाच्या दर्शनाची आस घेऊन हजारो वारकरी पंढरीच्या वाटेवर चालत असतात. कुणी श्रीमंत, कुणी सामान्य कष्टकरी; कुणी उच्चशिक्षित, तर कुणी निरक्षर. मात्र विठ्ठलनामाच्या गजरात या सगळ्यांची ओळख एकच उरते, ती म्हणजे 'वारकरी'. माणसामाणसांमधील भेद विसरून एकाच भक्तिभावाने चालणारी ही माणसांची मांदियाळी समतेच्या विचाराचे जिवंत दर्शन घडवते. म्हणूनच पंढरीची वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून जातिभेदाच्या पलीकडे जाऊन माणसाला माणसाशी जोडणारी सांस्कृतिक आणि सामाजिक चळवळ आहे.

कार्तिकी वारीचे आध्यात्मिक महत्त्व केवळ विठ्ठलाच्या दर्शनापुरते मर्यादित नाही. या वारीतून माणसाला स्वतःकडे पाहण्याची, मनातील अहंकार दूर करण्याची आणि जीवनाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी मिळते. चंद्रभागेच्या तीरावर पोहोचल्यावर वारकऱ्यांच्या मनात निर्माण होणारा आनंद हा केवळ देवदर्शनाचा नसतो, तर दीर्घ प्रवासानंतर मिळालेल्या सामूहिक समाधाना-चाही असतो. वारीतील प्रत्येक पाऊल माणसाला संयम, सहनशीलता, परस्पर सहकार्य आणि समर्पण शिकवत असते. कुणाचा पाय दुखला तर दुसरा त्याला आधार देतो. कुणाला पाण्याची गरज भासली तर अनोळखी व्यक्ती मदतीला धावून येते. अशा छोट्या कृतींतूनच भक्तीचे खरे सामाजिक रूप प्रकट होते.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेने समतेच्या विचाराला वैचारिक अधिष्ठान दिले आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या तत्त्वज्ञानातून विश्वात्मकतेचा आणि सर्वभूतांच्या कल्याणाचा विचार मांडला. त्यांच्या पसायदानातील 'भूतां परस्परे पडो। मैत्र जीवांचे।।' ही प्रार्थना माणसामाणसांमधील मैत्रीचे व्यापक तत्त्वज्ञान सांगते. संत नामदेवांच्या विठ्ठलभक्तीने देव आणि भक्त यांच्यातील अंतर कमी केले. संत एकनाथांनी आपल्या आचरणातून समता, करुणा आणि मानवतेचा संदेश दिला. या संतांनी भक्तीला केवळ वैयक्तिक मुक्तीचे साधन न मानता सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनवले.

संत चोखामेळा यांच्या जीवना-तून जातिभेदाच्या वेदनेचे अत्यंत संवेदनशील दर्शन घडते. विठ्ठलभक्तीची उत्कटता असूनही तत्कालीन सामाजिक विषमतेचे चटके सहन करावे लागलेल्या चोखोबांचे जीवन आजही आपल्याला प्रश्न विचारते. देवाच्या दारी सर्व समान असतील, तर माणसांच्या दारी भेदभाव कशासाठी? संत तुकाराम महाराजांनी अभंगांच्या माध्यमातून समाजातील दांभिकता, अहंकार आणि कर्मकांडावर प्रहार केला. संत जनाबाईंच्या अभंगांतून स्त्रीजीवनातील श्रम, भक्ती आणि आत्मसन्मान यांचे दर्शन घडते. या संतपरंपरेचे वैशिष्ट्य असे की, तिने भक्तीला सामाजिक वास्तवापासून कधीही वेगळे केले नाही.

वारकरी संप्रदायाची खरी ताकद त्याच्या सामूहिकतेत आहे. दिंडीमध्ये चालताना कोणाच्या जातीचा, आर्थिक परिस्थितीचा किंवा सामाजिक प्रतिष्ठेचा विचार केला जात नाही. टाळ वाजवणारा, मृदंग वाजवणारा, पताका घेऊन चालणारा आणि वाटेवर सेवा करणारा प्रत्येक जण वारीचा समान घटक असतो. कुणी अन्नदान करतो, कुणी पाणी वाटतो, तर कुणी थकलेल्या वारकऱ्यांना मदत करतो. येथे मोठेपणा पदाने किंवा पैशाने ठरत नाही, तर तो माणसाच्या सेवाभावाने ठरतो. श्रमाला प्रतिष्ठा आणि सेवेला महत्त्व देणारी ही परंपरा सामाजिक समरसतेचा सुंदर आदर्श घालून देते.

वारीतील स्त्रियांचा सहभागही या परंपरेला व्यापक अर्थ देणारा आहे. डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन, अभंग गात पायी चालणाऱ्या महिला वारकरी या भक्तीपरंपरेतील स्त्रीशक्तीचे दर्शन घडवतात. संत मुक्ताबाई, जनाबाई आणि बहिणाबाई यांच्या विचारपरंपरेने स्त्रीच्या आध्यात्मिक अभिव्यक्तीला महत्त्व दिले. भक्तीच्या क्षेत्रात स्त्रीला स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करता येते, याची जाणीव या परंपरेतून होते. मात्र या समतेचा विचार वारीपुरता मर्यादित न राहता घर, समाज आणि सार्वजनिक जीवनातही उतरायला हवा.

आजच्या काळात वारकरी विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या क्षेत्रात आपण प्रगती केली असली, तरी माणसामाणसांमधील अंतर वाढताना दिसते. जातीच्या नावाने होणारा भेदभाव, आर्थिक विषमता, अहंकार, असहिष्णुता आणि परस्परांविषयी कमी होत चाललेली संवेदनशीलता हे समाजापुढील प्रश्न आहेत. अशा परिस्थितीत संतपरंपरेतील समता, बंधुता आणि सहिष्णुतेचा विचार केवळ ऐतिहासिक वारसा म्हणून जपून चालणार नाही; तो आपल्या दैनंदिन वर्तनात उतरवावा लागेल.

वारी आपल्याला एक महत्त्वा-चा जीवनधडा देते. दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे, गरजवंताला मदत करणे, श्रमाचा सन्मान करणे आणि माणसाला त्याच्या जातीपेक्षा माणूसपणातून ओळखणे, हीच खरी आध्यात्मिकता आहे. मंदिरात जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच मंदिराबाहेर एखाद्या गरजू माणसाला आधार देणेही महत्त्वाचे आहे. भक्ती जर माणसाला अधिक संवेदनशील आणि सहृदयी बनवत नसेल, तर त्या भक्तीच्या आशयाचा नव्याने विचार करण्याची गरज आहे.

पंढरीची वारी दरवर्षी येते आणि लाखो पावलांना भक्तीच्या एका धाग्यात बांधून जाते. वारीतील भगव्या पताका, टाळ-मृदंगाचा नाद आणि विठ्ठलनामाचा गजर काही दिवसांनी शांत होतो; मात्र या प्रवासातून मिळालेली समतेची शिकवण आपल्या मनात कायम राहायला हवी. वारी संपल्यानंतर पुन्हा आपल्या घरात आणि समाजात जातिभेदाच्या भिंती उभ्या करणार असू, तर वारीच्या अनुभवातून नेमके काय मिळवले, असा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे.

विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरी गाठणे ही श्रद्धेची गोष्ट आहे; पण प्रत्येक माणसात माणूस पाहणे ही संस्कारांची गोष्ट आहे. देवाच्या पायाशी नतमस्तक होताना माणसाचा स्वाभिमान दुखावला जाणार नाही, याची काळजी घेणे हीच खरी भक्ती आहे. जातिभेदाच्या भिंती ओलांडून जेव्हा माणूस माणसाशी जोडला जातो, तेव्हाच पंढरीची वारी खऱ्या अर्थाने माणुसकीची वारी ठरते.

-प्रा. डॉ. कृष्णा तेरकर
धाराशिव
मो. ९४२२१०५१०१

काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, दूरदर्शनने उमटवला ठसा कायम!

एकेकाळी संपूर्ण कुटुंबाला एका छोट्याशा पडद्यासमोर एकत्र आणणारे, जगाच्या कानाकोपऱ्यातील घडामोडी घरबसल्या दाखवणारे आणि ज्ञानासोबत मनोरंजनाची मेजवानी देणारे प्रभावी माध्यम म्हणजे दूरदर्शन!

कृष्णधवल चित्रांच्या साध्या विश्वापासून ते आजच्या रंगीत, डिजिटल आणि स्मार्ट स्क्रीनपर्यंत दूरदर्शनने एक विलक्षण प्रवास केला आहे. काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, मनोरंजनाची साधने बदलली; मात्र समाजमनावर दूरदर्शनने उमटवलेला ठसा आजही कायम आहे.

बातम्यांमधून जगाची ओळख करून देणारे, शैक्षणिक कार्यक्रमांतून ज्ञानाची कवाडे उघडणारे, सांस्कृतिक कार्यक्रमांतून परंपरांचा वारसा जपणारे आणि सामाजिक संदेशांतून जनजागृती करणारे दूरदर्शन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाच्या जडणघडणीतील एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे. माहिती, शिक्षण, मनोरंजन आणि प्रबोधन यांचा सुंदर संगम असलेल्या या माध्यमाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी २१ नोव्हेंबर रोजी जागतिक दूरदर्शन दिन साजरा केला जातो.

चला तर मग, छोट्या पडद्याच्या या मोठ्या विश्वाचा प्रवास जाणून घेऊया आणि दूरदर्शनच्या योगदानाला मनापासून सलाम करूया! एका छोट्याशा पडद्याने जग जवळ आणले, ज्ञानाचे नवे क्षितिज खुले केले आणि पिढ्यान्पिढ्यांच्या आठवणींना उजाळा दिला हेच दूरदर्शनचे खरे सामर्थ्य! दूरदर्शनचा प्रवास हा तंत्रज्ञानातील प्रगतीचा एक अद्भुत प्रवास आहे. सुरुवातीच्या काळात कृष्णधवल दूरदर्शनवर मर्यादित कार्यक्रम पाहायला मिळत असत. त्यानंतर रंगीत दूरदर्शनचे आगमन झाले आणि मनोरंजनाच्या दुनियेला नवा रंग मिळाला. पुढे केबल व सॅटेलाइट टीव्हीमुळे विविध भाषांतील आणि विषयांवरील असंख्य वाहिन्या प्रेक्षकांच्या भेटीला आल्या. डिजिटल तंत्रज्ञानामुळे प्रसारण अधिक आधुनिक आणि दर्जेदार झाले. आज स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून इंटरनेट, ऑनलाइन कार्यक्रम आणि डिजिटल मनोरंजनाचे विशाल विश्व आपल्या घरातच उपलब्ध झाले आहे. अशा प्रकारे दूरदर्शनचे स्वरूप बदलत गेले, मात्र त्याचे महत्त्व आजही कायम आहे.

दूरदर्शन हे माहिती प्रसाराचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. त्याच्या माध्यमातून देश-विदेशातील घडामोडींची माहिती आपल्याला घरबसल्या मिळते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक



तसेच आंतरराष्ट्रीय घटनांचा आढावा बातम्या आणि विविध कार्यक्रमांद्वारे घेतला जातो. नैसर्गिक आपत्ती, हवामान, सरकारी योजना आणि महत्त्वाच्या घडामोडींची माहिती त्वरित लोकांपर्यंत पोहोचते. त्यामुळे नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होऊन त्यांना समाजातील परिस्थितीची जाणीव होते. अशा प्रकारे दूरदर्शन हे जगाशी जोडणारे माहितीचे प्रभावी माध्यम ठरले आहे.

दूरदर्शन हे समाजात सकारात्मक बदल घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे. विविध माहितीपट, जाहिराती, चर्चासत्रे आणि जनजागृतीपर कार्यक्रमांच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्रीशिक्षण, बालविवाह प्रतिबंध, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यविषयक विषयांवर प्रकाश टाकला जातो. समाजातील विविध समस्या, अन्याय, कुप्रथा आणि असमानता यांची जाणीव लोकांना करून दिली जाते. तसेच महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, मुलींचे शिक्षण आणि सामाजिक समानतेचे महत्त्व पटवून दिले जाते. नागरिकांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनाची भावना निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दूरदर्शन करते. अशा प्रकारे दूरदर्शन हे सामाजिक प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे.

दूरदर्शन हे शेतकऱ्यांसाठी ज्ञान, माहिती आणि मार्गदर्शन देणारे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. विविध कृषीविषयक कार्यक्रम, तज्ज्ञांच्या मुलाखती आणि चर्चांमधून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, खतांचा योग्य वापर, ठिबक सिंचन आणि पीक व्यवस्थापन यांची माहिती मिळते. तसेच हवामानाचा अंदाज, पावसाची स्थिती, बाजारभाव, पीकविमा आणि शासनाच्या कृषी योजनांची माहिती घरबसल्या उपलब्ध होते. शेतीतील नवनवीन प्रयोग, आधुनिक उपकरणे आणि यशस्वी शेतकऱ्यांचे अनुभव यांमुळे प्रगत शेती करण्याची प्रेरणा मिळते. अशा प्रकारे दूरदर्शन हे शेतकऱ्यांचे माहितीपूर्ण मार्गदर्शक आणि शेतीच्या प्रगतीचे प्रभावी माध्यम ठरले आहे.

दूरदर्शन हे भारतीय संस्कृती, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जतन करून तो नव्या पिढीपर्यंत पोहोचविणारे प्रभावी माध्यम आहे. विविध कार्यक्रम, माहितीपट आणि सांस्कृतिक मालिकांच्या माध्यमातून भारतीय सण, उत्सव, धार्मिक परंपरा, लोककला, लोकगीते, लोकनृत्य आणि ऐतिहासिक वारशाची माहिती दिली जाते. देशातील विविध राज्यांच्या भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती आणि जीवनशैली यांची ओळख घरबसल्या होते. तसेच महाराष्ट्राची लावणी, पोवाडा, भारूड, गोंधळ यांसारख्या लोककलांना व्यासपीठ मिळते. विविध संस्कृतींच्या परिचयामुळे परस्परांविषयी आदर, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागते. अशा प्रकारे भारतीय संस्कृतीचे वैभव जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दूरदर्शन करते.

दूरदर्शन हे क्रीडा क्षेत्राच्या विकासाला चालना देणारे आणि खेळाडूंना प्रोत्साहन देणारे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे थेट प्रक्षेपण केले जाते. क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, कबड्डी, कुस्ती, बॅडमिंटन, ऑलिम्पिक आणि इतर खेळांच्या स्पर्धांमुळे क्रीडाप्रेमींना घरबसल्या खेळांचा आनंद घेता येतो. तसेच नामवंत खेळाडूंच्या कामगिरीचा आढावा, यशोगाथा, मुलाखती आणि संघर्षमय प्रवासातून प्रेक्षकांना प्रेरणा मिळते. विविध खेळांची माहिती आणि नियम समजल्यामुळे क्रीडाविषयक आवड निर्माण होते. विशेषतः नवोदित खेळाडूंना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि यश मिळविण्याची प्रेरणा मिळते. अशा प्रकारे दूरदर्शन देशातील क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देते.

दूरदर्शन हे देशातील विविध भाषा, धर्म, जाती आणि संस्कृतींना एकत्र जोडणारे प्रभावी माध्यम आहे. भारताच्या विविध भागांतील लोकांना एकमेकांच्या परंपरा, चालीरीती, वेशभूषा, लोककला आणि जीवनशैलीची ओळख होते. प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्यदिन, राष्ट्रीय सण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ऐतिहासिक प्रसंगांचे प्रसारण करून देशवासीयांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण केली जाते. विविध राज्यांतील सांस्कृतिक कार्यक्रमांना व्यासपीठ मिळाल्यामुळे परस्परांविषयी आदर आणि आपुलकी वाढते. तसेच देशाच्या ऐतिहासिक परंपरा, राष्ट्रीय कर्तृत्व आणि सामूहिक यशाची माहिती लोकांपर्यंत पोहोचते. भारताची भाषा, वेशभूषा, संस्कृती आणि परंपरांमध्ये विविधता असली तरी आपण सर्व भारतीय आहोत, ही एकतेची भावना दृढ करण्याचे कार्य दूरदर्शन करते. अशा प्रकारे 'विविधतेत एकता' या भारतीय संस्कृतीच्या महान मूल्याला बळकटी मिळते.

कृष्णधवल चित्रांपासून रंगीत पडद्यापर्यंत आणि पारंपरिक प्रसारणापासून आधुनिक डिजिटल विश्वापर्यंत दूरदर्शनने केलेला प्रवास खरोखरच थक्क करणारा आहे. काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, मनोरंजनाची साधने बदलली; मात्र माहिती, शिक्षण, मनोरंजन, संस्कृतीचे जतन आणि सामाजिक प्रबोधन यांमधील दूरदर्शनचे योगदान आजही महत्त्वपूर्ण आहे.

आज इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या युगात मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध झाली असली, तरी दूरदर्शनचे सामाजिक आणि शैक्षणिक महत्त्व कमी झालेले नाही. समाजाला माहिती देणे, नव्या पिढीला ज्ञान देणे, संस्कृतीचा वारसा जपणे आणि देशाला एकतेच्या धाग्यात बांधणे ही दूरदर्शनची भूमिका आजही मोलाची आहे.

दूरदर्शन म्हणजे केवळ चित्रांचा पडदा नाही, तर तो जगाशी जोडणारा दुवा, ज्ञानाचा खजिना, संस्कृतीचा आरसा आणि समाजपरिवर्तनाचा एक प्रभावी मार्ग आहे. चला, या ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाच्या प्रभावी माध्यमाचा योग्य वापर करूया आणि प्रगत, जागरूक व सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीत योगदान देऊया. पडदा छोटा असला तरी त्याचे विश्व विशाल आहे; काळ बदलला तरी त्याचे महत्त्व विशेष आहे! दूरदर्शन हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही, तर समाजाच्या प्रगतीचे प्रतिबिंब आहे!

-डॉ. शिवराज कदम
नांदेड.
मो. ९७६७८३०४९८

सगुण-निर्गुण एकचि पांडुरंग!



कार्तिकी एकादशी जिला प्रबोधिनी एकादशी किंवा देवउठनी एकादशी असेही म्हटले जाते. या दिवशी पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपुरात लाखो भक्त एकवटतात. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पांडुरंगाला वारकरी प्रेमाने विठूमाऊली म्हणतात. आपल्या भक्तांच्या प्रेमाखातर पांडुरंग पंढरपुरात युगोनुयुगे अविरतपणे उभा आहे. भक्तांच्या हाकेला ओ देणारी आबालवृद्धांची ही माउली कधी भक्तांच्या घरी पाणी भरते, कधी त्यांचे दळण दळून देते. कधी त्यांच्या सासू सासऱ्यांची सेवा करते तर कधी त्यांच्या घरी चाकरीही करते.

भक्तांच्या अधीन असलेली ही माउली आणि तिची वारकरी लेकरे ही महाराष्ट्रातील आगळे वेगळे नाते आहे. महाराष्ट्रासह कर्नाटकातही माउलीचे लाखो भक्त आहेत. कार्तिकी एकादशीला ते न चुकता पंढरपुरात येतात. पुंडलिकाच्या वेळी पंढरपूरला स्थापन झालेली पांडुरंगाची ही मूर्ती पुढे कर्नाटकातील विजयनगरच्या राजाने त्याच्या साम्राज्यात नेली. त्याने त्या मूर्तीची तुंगभद्रेच्या तिरावर स्थापना केली. त्या काळी महाराष्ट्रातील पैठण येथील संत एकनाथ महाराज यांचे आजोबा संत भानुदास हे विठ्ठलाचे मोठे भक्त होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. एकदा विठ्ठलाने प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत दिला आणि 'मी कर्नाटकात आहे. तू मला पंढरपुरात नेऊन माझी स्थापना कर', असे सांगितले. विठ्ठलाने सांगितल्याप्रमाणे संत भानुदास यांनी विजयनगरच्या राजाकडे जाऊन विठ्ठलाच्या मूर्तीची मागणी केली. राजालाही दृष्टांत झाला होता. त्यामुळे संत भानुदासांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती पाहून राजाने ती मूर्ती त्यांना दिली. संत भानुदासांनी ती मूर्ती पंढरपूरला आणून तिची प्रतिष्ठापना केली. पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात.

शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

दक्षिणेला हाच गोपाल 'श्रीव्यंकटेश ऊर्फ तिरुपती बालाजी' म्हणून प्रसिद्ध आहे; कारण व्यंकटेशाची पत्नी पद्मावती आहे, तर विठ्ठलाच्या पत्नीचेही नाव पद्मावती (पदुबाई) आहे. व्यंकटेशाची पत्नी पद्मावती त्याच्यावर रूसून तिरूयानूर येथे चिंचेच्या वनात रहायला गेली, तर विठ्ठलाची पत्नी रुक्मिणी ही दिंडीर वनात (चिंचेच्या वनात) जाऊन बसली होती. 'विठ्ठलाला 'पांडुरंग' म्हणतात', तसेच व्यंकटेशालाही कर्नाटकातील पर्वताच्या स्थलनामावरून 'वेंगडम्' असे म्हणतात. त्यामुळेच त्याला 'विठ्ठलेश्वर अथवा व्यंकटेश' असेही म्हणतात. कुरूबा आणि धनगर यांचा देव एकरूप होऊन त्यातून 'विठोबा' निर्माण झाला. शिला प्रतिमेतून ही जी सांगोपांग मूर्ती घडली, ती मात्र या दोन्ही जमातींनी शतकानुशतके त्याच रूपात जपून ठेवली असली पाहिजे; म्हणूनच विठ्ठल आणि तिरुपति या दोन्ही मूर्तीत पुष्कळ साम्य आढळते.

पंढरीचा विठोबा दोन्ही हात कटीवर ठेवून उभा आहे, तर कर्नाटकात तो एक हात कटीवर आणि दुसरा हात वरद मुद्रेत असलेला अशा स्वरूपात अनेक ठिकाणी पहायला मिळतो. त्यामुळेच संतांनी 'सावळा हो विठ्ठलु कर्नाटकु', असे त्याचे वर्णन केले आहे. संतांनी त्याला 'कानडा' म्हणूनही हाक मारली आहे. चैतन्याची ज्या अनुसंधानातून आराधना केली जाते, त्या स्वरूपात ते प्रगट होते. ज्याचा जसा भक्तीभाव असेल, तशी त्याला देव अनुभूती देतो. बंगालमधील कोलकाता येथील कोळ्यांच्या राणीने दक्षिणेश्वरीदेवीची स्थापना केली होती. त्या देवळात तिने श्रीरामकृष्ण परमहंस यांची पुजारी म्हणून नियुक्ती केली होती. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या भक्ती-भावामुळे देवी त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि तिने त्यांना दर्शन दिले. अनेकांना वाटते, 'दगडात देव असतो का ?'; परंतु 'भक्ती-भावाने दगडालाही पाझर फुटतो', हे ध्यानात घ्यायला हवे.

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच ! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे.

एकदा लह

शंकरनगर परिसरात ग्रामपंचायत अधिकारी गायबच!

सीईओंच्या आदेशालाही केराची टोपली; बीडीओंचे मौन कायम, ग्रामस्थांचा संताप अनावर; आता थेट आंदोलनाचा इशारा!

शंकरनगर (प्रतिनिधी)– शंकरनगर परिसरातील ग्रामपंचायतींचा कारभार ग्रामसेवकांच्या अनियमित उपस्थितीमुळे अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र आहे. याबाबत 'दैनिक गोदातीर समाचार'ने यापूर्वी सविस्तर वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र, बातमी प्रसिद्ध होऊनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसत नाही. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) महेश पाटील यांनी ग्रामसेवकांना मुख्यालयी उपस्थित राहण्याचे स्पष्ट निर्देश दिल्याचे सांगितले जात असतानाही संबंधित ग्रामसेवकांकडून या निर्देशांची अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांनाच केराची टोपली दाखवली जात आहे का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित होत आहे.

हिप्परगा, किनाळा, धुप्पा, कुचेली, टाकळी, बिंजूर, केरूर, कामरसपल्ली, रामतीर्थ, चिटमोगरा, शेळगाव गौरी, बोरगाव, आळंदी, आटकळी आदी गावांतील ग्रामपंचायतींच्या कामकाजाबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी केल्या जात आहेत. ग्रामसेवक मुख्यालयी नियमित उपस्थित राहत नसल्याने जन्म-मृत्यू दाखले, घरकुल योजनांची कामे, विविध शासकीय प्रमाणपत्रे आणि इतर प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना वारंवार ग्रामपंचायत कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. अनेकदा कार्यालयात गेल्यानंतर संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्याने नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याची जबाबदारी असलेली यंत्रणाच वेळेवर उपलब्ध होत नसेल, तर ग्रामीण जनतेने न्याय मागायचा तरी कोणाकडे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

ग्रामपंचायतींच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी (बीडीओ) आणि विस्तार अधिकाऱ्यांची आहे. यापूर्वी वृत्त प्रसिद्ध होऊनही तसेच वरिष्ठ स्तरावरून निर्देश देण्यात आल्याचे सांगितले जात असतानाही ग्रामसेवकांच्या उपस्थितीबाबत ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.

या प्रकरणी विस्तार अधिकारी अनिकेत येरणे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे या गंभीर प्रश्नावर संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका काय आहे, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही.

ग्रामसेवकांच्या अनुपस्थितीची प्रत्यक्ष तपासणी केली जात आहे का? तपासणीचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविला जात आहे का? दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई का होत नाही? बीडीओ आणि विस्तार अधिकारी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणार कधी? असे अनेक सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत.

एकीकडे शंकरनगर परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि अनियमित वीजपुरवठ्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. दुसरीकडे ग्रामपंचायत स्तरावरील महत्त्वाची कामेही रखडल्याच्या तक्रारी आहेत. अशा परिस्थितीत ग्रामसेवक मुख्यालयी उपलब्ध नसल्याने नागरिकांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडत आहे. ग्रामीण जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असताना संबंधित यंत्रणेची निष्क्रियता नागरिकांच्या संतापात भर घालत आहे.

आता ग्रामस्थांनी प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे. संबंधित ग्रामसेवकांनी मुख्यालयी नियमित उपस्थित राहून ग्रामपंचायतींचे कामकाज सुरळीत करावे, प्रत्येक ग्रामपंचायतीची अचानक तपासणी करावी आणि अनुपस्थित आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा पंचायत समिती कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश केवळ कागदावरच राहणार की त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणार? बातमी प्रसिद्ध झाल्यानंतरही प्रशासनाला जाग येत नसेल, तर सामान्य नागरिकांनी दाद मागायची तरी कोणाकडे? हा प्रश्न आता संपूर्ण शंकरनगर परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

नांदेड रेल्वे विभागात विशेष तिकीट तपासणी मोहीम; २ दिवसांत २,१५५ प्रकरणांची नोंद; १५.४४ लाखांची वसुली

नांदेड (प्रतिनिधी)– प्रवाशांनी योग्य तिकीट घेऊनच रेल्वे प्रवास करावा, विनातिकीट प्रवासाला आळा बसावा तसेच रेल्वेच्या महसुलाचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत १२ नोव्हेंबर आणि १६ नोव्हेंबर २०२६ रोजी विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये विभागातील सर्व तिकीट तपासणी पथकांनी सक्रिय सहभाग घेतला. दोन्ही दिवशी एकूण ५८ तिकीट तपासणी कर्मचारी आणि ४ रेल्वे सुरक्षा दलाचे कर्मचारी सहभागी झाले. एकूण ५३ रेल्वे गाड्यांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेदरम्यान विविध प्रकारच्या अनियमित प्रवासाची एकूण २,१५५ प्रकरणे आढळून आली असून, त्यातून एकूण १५ लाख ४४ हजार ३१५ इतकी रक्कम वसूल करण्यात आली.

१२ नोव्हेंबर रोजी विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत २९ तिकीट तपासणी कर्मचारी आणि २ RPF कर्मचारी सहभागी झाले होते. एकूण २७ रेल्वे गाड्यांची तपासणी करण्यात आली.

या दिवशी एकूण १,३११ प्रकरणांची नोंद करण्यात आली आणि ९ लाख ७५ हजार ६०० इतकी रक्कम वसूल करण्यात आली. याशिवाय रेल्वे कायद्याच्या कलम १४४ अंतर्गत अनधिकृत फेरीवाल्यांविरूद्ध १ प्रकरण नोंदवून २ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

१६ नोव्हेंबर रोजी सर्व तिकीट तपासणी पथकांच्या सहभागाने विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत २९ कर्मचारी आणि २ RPF कर्मचारी सहभागी झाले होते. एकूण २६ रेल्वे गाड्यांची तपासणी करण्यात आली. या दिवशी एकूण ८४४ प्रकरणे नोंदविण्यात आली असून ५ लाख ६८ हजार ७१५ इतकी रक्कम वसूल करण्यात आली.



रेल्वे प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या अशा विशेष तपासणी मोहिमांचा मुख्य उद्देश विनातिकीट तसेच अनियमित प्रवासाला प्रतिबंध करणे, योग्य तिकीट घेऊन प्रवास करण्याबाबत प्रवाशांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि प्रामाणिकपणे तिकीट काढून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या हिताचे संरक्षण करणे हा आहे.

तसेच रेल्वेच्या नियमांचे पालन सुनिश्चित करून सुरक्षित, शिस्तबद्ध आणि जबाबदार प्रवास संस्कृती निर्माण करण्यासाठी अशा मोहिमा नियमितपणे राबविण्यात येत आहेत. या दोन्ही विशेष मोहिमांचे निरीक्षण शैलेश कुमार, सहायक वाणिज्य व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

सर्व प्रवाशांनी नेहमी वैध रेल्वे तिकीट घेऊनच प्रवास करावा, रेल्वेच्या नियमांचे पालन करावे आणि तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

इसापूर उजवा कालवा व सिंचन व्यवस्थेत अनधिकृत हस्तक्षेप केल्यास कठोर कारवाई

रब्बी हंगाम २०२६-२७ साठी कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड (प्रतिनिधी)– रब्बी व उन्हाळी हंगाम २०२६-२७ मध्ये उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर उजवा कालव्याच्या कालवा वितरण प्रणालीद्वारे होणाऱ्या सिंचन व बिगर सिंचन पाणीपुरवठ्याचे नियोजन सुरळीत आणि नियंत्रित पद्धतीने व्हावे, तसेच उपलब्ध पाण्याचे न्याय्य पद्धतीने वितरण व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर उजव्या कालव्याचे रब्बी हंगाम २०२६-२७ मधील पहिले कालवा आवर्तन दि. १ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू करण्यात आले आहे. या कालव्याद्वारे नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, भोकर, मुदखेड, उमरी, हदगाव व हिमायतनगर या तालुक्यांतील गावांना सिंचनाचा लाभ मिळतो. तसेच हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी व वसमत तालुक्यांनाही या कालव्याचा लाभ होतो. मात्र, सद्यस्थितीतील दुष्काळी परिस्थितीमुळे सिंचनाच्या पाण्याची मागणी वाढली असून, उपलब्ध पाण्याचे नियोजनबद्ध वितरण करणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर कालव्यावरील काटनियामक (सी.आर.), एस्केप व इतर नियंत्रण संरचनांमध्ये अनधिकृत हस्तक्षेप करणे, कालव्याचे दरवाजे परस्पर उघडणे अथवा बंद करणे, कालव्यात अडथळे निर्माण करणे, अनधिकृत पाणी उपसा करणे, कालव्याचे नुकसान करणे तसेच पाणीवाटप करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यास मनाई करण्यात आली आहे. हे आदेश दि. १८ नोव्हेंबर २०२६ पासून ते दि. १६ जानेवारी २०२७ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक, नांदेड व संबंधित पोलीस विभागाने आवश्यक प्रतिबंधात्मक कारवाई करावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. आदेशाची व्यापक प्रसिद्धी देण्याची जबाबदारी संबंधित विभागांना सोपविण्यात आली असून, सर्व संबंधितांनी आदेशाचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जागतिक शौचालय दिनानिमित्त विशेष अभियान; नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– जागतिक शौचालय दिनाचे औचित्य साधून १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात 'स्वच्छ शौचालय, गरिमामय भविष्य' हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील सार्वजनिक, सामुदायिक तसेच शाळा व अंगणवाडीतील शौचालयांची स्वच्छता, सुरक्षितता आणि उपयुक्तता वाढविण्यासह प्रत्येक कुटुंबाने वैयक्तिक शौचालयाचा नियमित वापर करावा, यासाठी या अभियानात विशेष भर दिला जाणार आहे. या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागाच्या निर्देशानुसार हे अभियान राबविण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्र संघाने यंदाच्या जागतिक शौचालय दिनासाठी 'सुरक्षित शौचालये, समान भविष्य' ही संकल्पना निश्चित केली आहे. प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, स्वच्छ आणि सुलभ शौचालय सुविधा उपलब्ध व्हावी, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.



अभियानांतर्गत ग्रामीण भागातील सार्वजनिक व सामुदायिक स्वच्छता संकुले, शाळा आणि अंगणवाड्यांमधील शौचालयांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती व सुधारणा करण्यात येणार आहेत. विशेषतः महिला, विद्यार्थिनी आणि दिव्यांग व्यक्तींना शौचालयांचा सुरक्षित व सुलभ वापर करता यावा, यासाठी आवश्यक सुविधांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. तसेच एक खड्डा असलेल्या शौचालयांचे दोन खड्ड्यांच्या शौचालयांमध्ये रूपांतर, सोकपिट नसलेल्या सेप्टिक टँकमध्ये सोकपिटची सुविधा आणि मैला गाळ व्यवस्थापन नियमांचे पालन याबाबतही गावकऱ्यांना माहिती दिली जाणार आहे.

गावांचा हागणदारीमुक्त दर्जा कायम राखणे, शौचालयांचा नियमित वापर, साबणाने हात धुण्याची सवय रुजविणे आणि घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ बाबत जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाड्या, महिला बचत गट आणि ग्रामस्थांचा सहभाग घेतला जाणार आहे.

अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सार्वजनिक स्वच्छता संकुलांना, संस्थात्मक व वैयक्तिक घरगुती शौचालयांना प्रोत्साहन देण्यासाठी मूल्यमापन करण्यात येणार असून, उल्लेखनीय काम करणाऱ्या ग्रामपंचायती आणि लाभार्थ्यांचा गौरव केला जाणार आहे. ९ व १० डिसेंबर रोजी जिल्हा व ग्रामपंचायत स्तरावर सांगता कार्यक्रम आयोजित करून अभियानाची प्रगती स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) च्या निर्धारित प्रणालीवर नोंदविण्यात येणार आहे.

नदी नाल्याला त्वरित पाणी सोडा अन्यथा शिवसेना स्टाईलने धडा शिकवू -जिल्हाप्रमुख बारसे

अर्धापुर (प्रतिनिधी)– नांदेड जिल्ह्यातील नदीनाले कोरडे पडल्याने व पाणी पुरवठा योजनेच्या विहिरी नदी-नाल्याच्या काठावर असल्याने भविष्यात पाण्याची टंचाई व वॉटर लेव्हल बरोबर राहील यासाठी नदी, नाल्याला पाणी सोडावे, अशी मागणी निवेदनाद्वारे शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे केली आहे.



भविष्यातील संभाव पाणीटंचाई टाळण्यासाठी अर्धापूर, नांदेड, मुदखेड, हदगाव, भोकर या भागांत इसापूर धरणाच्या पहिल्या आवर्तनाचे पाणी सोडण्यात आले. तसेच सिद्धेश्वर धरणाचे पाणी नांदेड जिल्ह्यातील ज्या तालुक्यात येते त्या भागातील सर्व नदी नाल्यांना तातडीने पाणी सोडून जनावरांना चारा व पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही यासाठी नदी, नाल्यांना त्वरित पाणी सोडावे अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करू, असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. नांदेड, अधीक्षक अभियंता पाटबंधारे विभाग उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ कार्यालय नांदेड, कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद पाणीपुरवठा मृद व जलसंधारण विभाग नांदेड यांच्याकडे लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे.

नांदेड परिमंडलात अभय योजनेला वीज ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; योजनेत ३५८ ग्राहकांनी नोंदवला सहभाग

नांदेड (प्रतिनिधी)– वीज बिलांच्या थकबाकीमुक्तीसाठी लघु व उच्चदाबाच्या कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित बिगरकृषी वीज ग्राहकांसाठी महावितरणची 'अभय योजना २०२६-२७' सुरु असून अवघ्या ११ दिवसांत नांदेड परिमंडलातील ३५८ ग्राहकांनी प्रत्यक्ष अर्ज करुन योजनेस प्रतिसाद दिला. त्यापैकी ८३ ग्राहकांनी १०.३३ लाख रुपयांचा थकित वीज बिल भरणा केलेला आहे. मुख्य अभियंता राजाराम माने यांच्याकडून योजनेत सहभागी झालेल्या ग्राहकांचे कौतुक करण्यात आले.

नांदेड परिमंडलातील नांदेड जिल्ह्यात थकबाकीपोटी तात्पुरत्या आणि कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या १,७७,१६५ ग्राहकांकडे १७२.८९ कोटी, परभणी जिल्ह्यात १,३१,४०२ ग्राहकांकडे ३४१.८३ कोटी तर हिंगोली जिल्ह्यातील १,००,०४८ ग्राहकांकडे ११५.७५ कोटी रुपयांची मूळ थकबाकी आहे. पैकी अभय योजनेत नांदेड जिल्ह्यातील ४३, परभणी जिल्ह्यातील २८ तर हिंगोली जिल्ह्यातील १२ ग्रहकांनी योजनेत १०.३३ लाख रुपये भरुन लाभ घेतला आहे. त्यात भोकर विभागातील बालाजी पवार यांनी ५८९० रुपये, व्दारकाबाई बाभळे-११३८० रुपये, सुमनबाई कानखरे ४६५० रुपये, सागरबाई सोनाळे यांनी ४५०० रुपये, परभणीतील झरीचे सुंदर कऱ्हाळे यांनी १३८४०, अशोक जोंधळे रा. परभणी ४५२३० रुपये, गौतम जोंधळे १६६८८, दिनकर गजमल रा बोरी- ८३११ रुपयांसह परिमंडलात ८३ लाभार्थ्यांनी १०.३३ लाख रुपयांचा भरणा केला. त्यांना व्याज आणि दंडाच्या रक्कमेत शंभर टक्के सवलत मिळाली असून काहींना एकरकमी बील भरल्याचाही लाभ देण्यात आल्याने त्यांना लाखो रुपयांचा फायदा झालेला आहे. योजनेच्या प्रभावी अमलबजावणीसाठी परिमंडलात शाखा कार्यालय स्तरापर्यंत लाभार्थ्यांच्या दारोदारी जाऊन जनजागृती करण्यात येत आहे.

थकबाकीमुक्तीसाठी घसघशीत सवलतींचा समावेश असणाऱ्या अभय योजनेअंतर्गत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार १०० टक्के माफ करण्यात येणार आहे. तर उर्वरित मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास त्यात आणखी २० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे. यासह ग्राहकांच्या मागणीनुसार पुनर्जोडणीही तत्काळ मिळणार आहे.

३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या उच्च व लघुदाब वर्गवारीमधील थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडित झाला आहे असे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर बिगरकृषी (शेती व सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजना वगळून) ग्राहक तसेच दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेले ग्राहक 'अभय योजना २०२६-२७' साठी पात्र आहेत. तसेच महावितरण डिस्ट्रीब्यूशन फ्रॅन्चाईजीमधील ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

जातीअंत संघर्ष समितीच्या राज्य अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी प्रवीण पाटील



नांदेड (प्रतिनिधी)– जातीअंत संघर्ष समितीच्या महाराष्ट्र राज्य अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रवीण पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

या अधिवेशनाचे उद्घाटन शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी होणार असून, २१ व २२ नोव्हेंबर असे दोन दिवस हे अधिवेशन कौठा येथील सप्तगिरी बँक्वेट हॉल येथे आयोजित करण्यात आले आहे.

भांडवलशाहीविरोधात संघर्ष करीत जातीविहीन, वर्गविहीन, स्त्रीदास्यविहीन, भेदभावमुक्त, अन्याय-अत्याचारमुक्त आणि शोषणमुक्त समाजनिर्मितीचे ध्येय जातीअंत संघर्ष समितीने स्वीकारले आहे. स्त्री-पुरुष समानतेवर आधारित समताधिष्ठित समाजवादी समाजनिर्मितीसाठी ही समिती महाराष्ट्रात सातत्याने कार्यरत आहे. राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील सामाजिक अन्याय आणि अत्याचारांच्या घटनांमध्ये हस्तक्षेप करून पीडितांना

इसापूर धरणातून पैनगंगा नदीपात्रात पिण्यासाठी पाणी सोडा; पळसपूर ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– हिमायतनगर तालुक्यातील पळसपूर गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, नागरिकांसह जनावरांचेही हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर इसापूर धरणातून पैनगंगा नदीपात्रात पिण्यासाठी पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी पळसपूर ग्रामपंचायत विकास समिती व समस्त ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी हे निवेदन सादर करण्यात आले.

पळसपूर परिसरात दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून, नदी, नाले आणि ओढे कोरडे पडले आहेत. पाण्याअभावी पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जनावरांना चारा व पाणी मिळणे कठीण झाले असून, शेतकरी आणि शेतमजूर



मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. रोजगार व उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध नसल्याने अनेक कुटुंबांवर गाव सोडून इतर राज्यांत स्थलांतर करण्याची वेळ आली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पळसपूर हे गाव पैनगंगा नदीच्या काठावर वसलेले असतानाही गावकऱ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. इसापूर धरणाची निर्मिती झाल्यापासून या गावाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. धरणात पाणीसाठा वाढल्यानंतर नदीपात्रात पाणी सोडले जाते आणि त्यामुळे गावाला पुराचा धोका निर्माण होतो. अनेकदा शेती पाण्याखाली जाऊन पिकांचे तसेच जनावरांचे नुकसान होते. मात्र, आज पिण्याच्या पाण्यासाठी याच नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे.

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी गावात तातडीने जलसंधारणाची कामे सुरू करावीत, रोजगारनिर्मितीची कामे हाती घ्यावीत आणि पिण्याच्या पाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न सोडवावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध न झाल्यास ते व्यसनाधीनतेकडे वळण्याची भीती असून, नव्या पिढीचे शिक्षणही प्रभावित होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

गावात केवळ सातवीपर्यंत शाळा असल्याने पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना बाहेरगावी जावे लागते. पावसाळ्यात नाले व ओढ्यांना पाणी असल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास अडचणी येतात. गावातील बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असल्याने शेती आणि पाणी या दोन्ही प्रश्नांवर शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

वाघाळा येथील दत्तमठ संस्थान येथे चातुर्मास समाप्ती सोहळ्यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– वाघाळा येथील श्री दत्तमठ संस्थान-मध्ये अखंड दत्तनाम चातुर्मास समाप्ती सोहळ्यानिमित्त मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी पालखी मिरवणूक, प्रवचन, महापूजा आणि महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री दत्तशिखर संस्थान माहूरगडचे श्री श्री श्री १००८ महंत डॉ. धनेश्वर भारती महाराज तसेच गुरु आनंदगीर महाराज व गुरु दयाळगीर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा सोहळा उत्साहात साजरा होत आहे.

मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.०० वाजता आरती. सकाळी ९ ते दुपारी १



वाघाळ्यातील प्रमुख रस्त्यांवरून पालखी मिरवणूक निघेल. या मिरवणुकीत असदवन येथील भजनी मंडळ, श्री दत्त मंदिर (एन.डी. ३१, हडको), महिला भजनी मंडळ आणि वाघाळा भजनी मंडळ सहभागी होणार आहेत. दुपारी १ नंतर : गुरु रुद्रगीर गुरु दयाळगीर महाराज (किवळेकर) यांचे प्रवचन, त्यानंतर आरती आणि महाप्रसादाचे वितरण होईल. रात्री ८ वाजता : सव्वामन तांदळाची महापूजा संपन्न होईल. पहाटे : काकडा आरतीने या चातुर्मास समाप्ती सोहळ्याची सांगता होईल.

महापूजेचे आयोजक म्हणून भोंग गुरुजी, श्रीकांत लक्ष्मण घोगरे, परसराम पाटील ढाकणी, गंगाधर शिंदे ढाकणी यांच्यासह वाघाळा व सिडको-हडको येथील भक्तमंडळी परिश्रम घेत आहेत. या महापूजेसाठी वाघाळा, सिडको-हडको, गोपाळचावडी, पावरलूम, ढाकणी, असदवन, झरी, बोरगाव, आलेगाव, टाकळगाव, वडगाव, कौडगाव, वाका, जोशी सांगवी, लोंढेसांगवी, कामळज, नांदगाव, किवळा, बाभूळगाव, गुंडेगाव, कांजाळा, बोंढार येथील भजनी मंडळे तसेच चातुर्मासातील नित्य नियमाचे भजनी मंडळ व पुजारी द.भ.प. शिवाजी दिगंबर पुरी महाराज उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्याला श्री गुरु रुद्रगीर गुरु दयाळगीर महाराज, श्री श्री १०८ महंत गुरु समगीर गुरु जयगीर महाराज, श्री गुरु दत्तगीर गुरु आनंदगीर महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. पंचक्रोशीतील सर्व मठाधिपती, संत-महंत, गुरुभक्त व भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमांचा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन दत्तमठ संस्थान व समस्त गावकरी मंडळी, वाघाळा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

स्पीड कॅमेऱ्याजवळ गाडी स्लो करूनही कापलेय चलन?

आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाहनचालकांची युक्ती ठरतेय निष्फळ; दंड टाळण्याचा एकमेव मार्ग जाणून घ्या!

महामार्गावरून वेगाने गाडी चालवत असताना वेगमर्यादा तपासणाऱ्या कॅमेऱ्याजवळ पोहोचताच अनेक वाहनचालक गाडीचा वेग कमी करतात. कॅमेऱ्यासमोरून हळू गाडी नेल्यास अतिवेगाने वाहन चालवल्याचा दंड टाळता येईल, असा त्यांचा समज असतो. मात्र, असे करूनही अनेकांना मोबाईलवर वाहतूक नियमभंगाचे ई-चलन प्राप्त होते. त्यामुळे कॅमेऱ्याजवळ गाडीचा वेग नियंत्रित असतानाही चलन का आकारले जाते, असा प्रश्न उपस्थित होतो. यामागे वाहतूक नियंत्रणासाठी वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान कारणीभूत आहे. हे तंत्रज्ञान केवळ कॅमेऱ्यासमोरील वाहनाचा वेग तपासत नाही, तर काही ठिकाणी दोन ठरावीक ठिकाणांमधील प्रवासाचा सरासरी वेगही मोजते.



कमी वेगाने गाडी चालवूनही चलन का आकारतात?

महामार्ग किंवा द्रुतगती मार्गांवर वाहनचालक अनेकदा वेगमर्यादा तपासणाऱ्या कॅमेऱ्याजवळ आल्यानंतर गाडीचा वेग कमी करतात. मात्र, आधुनिक वेगमापक कॅमेरे रडार आणि लिडार यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करतात. या प्रणालींच्या साहाय्याने वाहनांचा वेग काही अंतरावरूनच मोजता येतो. त्यामुळे कॅमेऱ्याजवळ पोहोचण्यापूर्वीच वाहनाचा वेग निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक असल्याची नोंद झाली असेल, तर कॅमेऱ्यासमोर गाडीचा वेग कमी करूनही दंड आकारला जाऊ शकतो. म्हणजेच कॅमेऱ्याजवळ अचानक वेग कमी करण्याची युक्ती आधुनिक वाहतूक निगराणी व्यवस्थेसमोर निष्फळ ठरू शकते.

सरासरी वेग मोजणारे तंत्रज्ञान कसे काम करते?

भारतातील काही प्रमुख महामार्ग आणि द्रुतगती मार्गांवर सरासरी वेग मोजणारी यंत्रणा



वापरली जाते. या पद्धतीत रस्त्यावरील काही किलोमीटरच्या अंतरावर दोन वेगवेगळ्या ठिकाणी कॅमेरे बसवलेले असतात. पहिल्या कॅमेऱ्यासमोरून वाहन गेल्यानंतर त्याच्या क्रमांकाच्या पाटीची आणि वाहन गेल्याच्या वेळेची नोंद केली जाते. त्यानंतर दुसऱ्या कॅमेऱ्यासमोरून तेच वाहन गेल्यावर पुन्हा वाहन क्रमांक आणि वेळ नोंदवली जाते. यानंतर दोन्ही कॅमेऱ्यांमधील अंतर आणि ते अंतर पार करण्यासाठी वाहनाने घेतलेला वेळ यांची तुलना केली जाते. निर्धारित वेळेपेक्षा कमी वेळेत वाहनाने अंतर पार केले असल्यास त्याचा सरासरी वेग अधिक असल्याचे स्पष्ट होते. हा वेग संबंधित मार्गावरील निर्धारित वेगमर्यादेपेक्षा जास्त असल्यास नियमांनुसार ई-चलन जारी केले जाऊ शकते.

आधुनिक कॅमेऱ्यांची महत्त्वाची भूमिका

या संपूर्ण प्रक्रियेत एएनपीआर (ANPR - Automatic Number Plate Recognition) म्हणजेच वाहनांच्या क्रमांकाच्या पाट्या स्वयंचलितपणे ओळखणाऱ्या कॅमेऱ्यांची महत्त्वाची भूमिका असते. हे कॅमेरे प्रगत प्रतिमा प्रक्रिया तंत्रज्ञानाच्या मदतीने वाहनांच्या क्रमांकाच्या पाट्या वाचतात. दिवस असो किंवा रात्र, वाहनांची ओळख पटवून आवश्यक माहिती संगणकीय प्रणालीपर्यंत पोहोचवण्याचे काम ते करतात. दोन ठिकाणी बसवलेल्या अशा कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वाहनाचा प्रवासकाल मोजला जातो. वाहनाने निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक सरासरी वेगाने प्रवास केल्याचे आढळल्यास संबंधित नियमांनुसार वाहनमालकाच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर ई-चलन पाठवले जाऊ शकते.

अतिवेगाचा दंड टाळण्यासाठी काय करावे?

आधुनिक वाहतूक निगराणी यंत्रणांमुळे वेगमर्यादा कॅमेऱ्यांना चकवा देण्याचे प्रकार आता अधिक कठीण झाले आहेत. कॅमेऱ्याजवळ पोहोचल्यानंतर अचानक वेग कमी करण्याऐवजी संपूर्ण प्रवासात निर्धारित वेगमर्यादेचे पालन करणे हाच दंड टाळण्याचा योग्य मार्ग आहे. वाहनचालकांनी महामार्गावरील वेगमर्यादेचे फलक लक्षपूर्वक पाहावेत. रस्त्याची स्थिती, हवामान, वाहतुकीची गर्दी आणि वाहनाचा प्रकार यांचा विचार करून सुरक्षित वेग राखावा. निर्धारित वेगमर्यादेपेक्षा कमी वेगाने वाहन चालवणे आणि वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.



लावा डोक्याला हात!



भारतात '123456' हाच सर्वाधिक वापरला जाणारा पासवर्ड; सायबर सुरक्षेबाबत नागरिक अजूनही बेफिकीर!

सोपे पासवर्ड वापरण्याची प्रवृत्ती कायम; 'password', 'Admin@123', 'Welcome@123' आणि 'India@123' यांचाही यादीत समावेश

पासवर्ड व्यवस्थापन क्षेत्रातील कंपनी नॉर्डपास (NordPass) च्या नव्या अहवालातून भारतातील नागरिकांच्या सायबर सुरक्षा जागरूकतेबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. भारतात आजही सर्वाधिक वापरला जाणारा पासवर्ड '123456' हाच आहे. त्यानंतर '12345678' आणि 'admin' या पासवर्डचा क्रमांक लागतो. विशेष म्हणजे, 'password', 'Admin@123', 'Welcome@123' आणि 'India@123' यांसारख्या सहज ओळखता येणाऱ्या पासवर्डचाही मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.


नॉर्डपासने प्रसिद्ध केलेल्या या अहवालानुसार, नागरिक अजूनही आपल्या ऑनलाइन खात्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेसे जागरूक नसल्याचे दिसून येते. अनेक जण लक्षात ठेवण्यास सोपे जावेत म्हणून साधे अंक, सामान्य शब्द किंवा परिचित नावांचा पासवर्ड म्हणून वापर करतात. मात्र, अशा पासवर्डचा अंदाज लावणे हॅकर्ससाठी तुलनेने सोपे असते. या संशोधनात आणखी एक रंजक बाब समोर आली आहे. वेगवेगळ्या पिढ्यांतील लोक आपल्या आवडत्या संगीत, चित्रपट, व्हिडिओ गेम्स तसेच इंटरनेटवरील लोकप्रिय ट्रेंडचा आधार घेऊन पासवर्ड तयार करतात. मेटालिका या लोकप्रिय संगीत समूहापासून ते 'स्किबिडी टॉयलेट'सारख्या नव्या इंटरनेट ट्रेंडपर्यंत अनेक गोष्टींचा प्रभाव पासवर्ड निवडताना दिसून येतो. मात्र, लोकप्रिय संस्कृतीशी संबंधित अशा परिचित शब्दांचा वापर केल्यामुळे पासवर्डचा अंदाज लावणे अधिक सोपे होऊ शकते. या अभ्यासात भारतासह जगातील अन्य ४४ देशांमध्ये सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या पासवर्डचे विश्लेषण करण्यात आले आहे. लोक पासवर्ड कशा प्रकारे तयार करतात आणि एकच पासवर्ड वेगवेगळ्या ऑनलाइन खात्यांसाठी पुन्हा पुन्हा कसा वापरतात, याचाही अभ्यास करण्यात आला आहे.



हे आहेत ते पासवर्ड

- 123456
- 12345678
- admin
- 1234
- 12345
- 123456789
- password
- 1234567890
- Admin@123
- Welcome@123
- admin@123
- India@123

एकंदरीत, डिजिटल व्यवहार आणि ऑनलाइन सेवांचा वापर वाढत असताना पासवर्डच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणे महागात पडू शकते.



सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या पासवर्डची यादी

नॉर्डपासने नॉर्डलेयर इंटेलिजन्स (NordLayer Intelligence) आणि सायबर सुरक्षा तज्ज्ञांच्या सहकार्याने हा अभ्यास केला आहे. सप्टेंबर २०२५ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेल्या माहितीगळतीच्या घटनांमधून आणि डार्क वेबवर उपलब्ध झालेल्या पासवर्डचे विश्लेषण करण्यात आले. या अहवालानुसार, भारतात सर्वाधिक वापरला जाणारा पासवर्ड '123456' आहे. त्यानंतर '12345678' आणि 'admin' यांचा क्रमांक लागतो.

जगभरातही '123456' पासवर्डचा बोलबाला

केवळ भारतातच नव्हे, तर जागतिक स्तरावरही '123456' हा पासवर्ड सर्वाधिक वापरला जात आहे. जागतिक यादीत 'admin' दुसऱ्या क्रमांकावर, तर '12345678' तिसऱ्या क्रमांकावर आहे. नॉर्डपासच्या माहितीनुसार, मागील वर्षीच्या तुलनेत जागतिक स्तरावरील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या पहिल्या चार पासवर्डमध्ये कोणताही बदल झालेला नाही. यावरून जगभरातील नागरिकांमध्ये सोपे आणि सहज ओळखता येणारे पासवर्ड वापरण्याची प्रवृत्ती कायम असल्याचे स्पष्ट होते. विशेष म्हणजे, एखाद्या परिचित शब्दासोबत काही अंक किंवा विशेष चिन्हे जोडल्याने पासवर्ड सुरक्षित होतोच असे नाही. उदाहरणार्थ, 'India@123' किंवा 'Welcome@123' यांसारखे पासवर्ड दिसायला वेगळे वाटत असले, तरी त्यांचा अंदाज लावणे सायबर गुन्हेगारांसाठी फारसे कठीण नसते.

पासवर्डमध्ये विशेष चिन्हांचा वापर वाढला

या अहवालातील आणखी एक महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे पासवर्डमध्ये विशेष चिन्हांचा (Special Characters) वापर वाढत आहे. यंदाच्या जागतिक यादीतील ३९ पासवर्डमध्ये विशेष चिन्हांचा समावेश आढळला आहे. गेल्या वर्षी ही संख्या ३२ होती. पासवर्डमध्ये विशेष चिन्हांचा वापर वाढणे ही सकारात्मक बाब असली, तरी केवळ विशेष चिन्हे जोडल्याने पासवर्ड पूर्णपणे सुरक्षित होत नाही. पासवर्डची लांबी, त्यातील अक्षरे, अंक आणि चिन्हांचे संयोजन तसेच तो किती अनोखा आहे, या बाबींनाही तितकेच महत्त्व आहे.

खात्यांच्या सुरक्षेसाठी काय काळजी घ्यावी?

- सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या ऑनलाइन खात्यांच्या सुरक्षेसाठी काही महत्त्वाच्या गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे.
- सहज ओळखता येणारे अंक, जन्मतारीख किंवा नावांचा पासवर्ड म्हणून वापर करू नये.
- प्रत्येक ऑनलाइन खात्यासाठी वेगळा आणि मजबूत पासवर्ड ठेवावा.
- शक्यतो लांब आणि सहज अंदाज न लावता येणारा पासफ्रेज वापरावा.
- पासवर्ड लक्षात ठेवण्यासाठी विश्वासार्ह पासवर्ड व्यवस्थापकाचा वापर करावा.
- महत्त्वाच्या खात्यांसाठी द्विस्तरीय प्रमाणीकरण (Two-Factor Authentication) सुरू ठेवावे.
- अनोळखी लिंकवर क्लिक करू नये तसेच संशयास्पद संकेतस्थळांवर पासवर्ड टाकणे टाळावे.

स्मार्टफोनची घ्या योग्य काळजी, वर्षानुवर्षे नवीन फोन खरेदी करण्याची उरणार नाही गरज!

'या' सोप्या सवयींमुळे जुन्या फोनची कार्यक्षमता राहील नव्यासारखी



दिवसेंदिवस स्मार्टफोनच्या किमती वाढत असल्याने दरवर्षी किंवा दोन वर्षांनी नवीन फोन खरेदी करणे सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे राहिलेले नाही. महागडे फ्लॅगशिप असोत किंवा मध्यम किमतीतील स्मार्टफोन, त्यांच्या किमती सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे एकदा खरेदी केलेला स्मार्टफोन शक्य तितकी अधिक वर्षे चांगल्या स्थितीत वापरण्याचा प्रयत्न अनेक जण करतात. मात्र, काही साध्या सवयी आणि योग्य काळजी घेतल्यास सध्याचा स्मार्टफोन अनेक वर्षे चांगल्या कार्यक्षमतेने वापरता येऊ शकतो. यासाठी फोनची नियमित स्वच्छता, स्टोरेजचे व्यवस्थापन, बॅटरीची काळजी आणि आवश्यक सॉफ्टवेअर अद्ययावत ठेवणे महत्त्वाचे आहे. या सवयी अंगीकारल्यास विनाकारण नवीन फोन खरेदी करण्याचा खर्चही टाळता येऊ शकतो.

- फोनमधील स्टोरेजची नियमित तपासणी करा : अनेक वर्षे स्मार्टफोन वापरल्यानंतर त्यामध्ये हजारो छायाचित्रे, व्हिडिओ, जुने ॲप्स आणि गेम्स जमा होतात. काही ॲप्स किंवा गेम्स केवळ एक-दोन वेळा वापरल्यानंतर तसेच फोनमध्ये पडून राहतात. यामुळे फोनमधील उपलब्ध साठवण क्षमता (स्टोरेज) कमी होते. स्टोरेज जवळपास पूर्ण भरल्यास फोनच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो. तसेच आवश्यक सॉफ्टवेअर अद्ययावत करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध राहत नाही. त्यामुळे वेळोवेळी फोनमधील स्टोरेज तपासा. वापरात नसलेले ॲप्स, अनावश्यक गेम्स, डुप्लिकेट छायाचित्रे आणि नको असलेल्या व्हिडिओ फाइल्स हटवा. महत्त्वाच्या फाइल्सचा बॅकअप घेऊन त्या सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवा.
- चांगल्या दर्जाचे कव्हर आणि स्क्रीन प्रोटेक्टर वापरा : महागडा स्मार्टफोन खरेदी केल्यानंतर त्याच्या संरक्षणासाठी स्वस्त आणि निकृष्ट दर्जाचे कव्हर वापरणे ही अनेकांची चूक असते. फोन दीर्घकाळ चांगल्या स्थितीत ठेवायचा असेल, तर त्याची बाह्य रचना आणि स्क्रीन सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. फोन पडल्यास त्याला धक्क्यापासून संरक्षण मिळेल, अशा चांगल्या दर्जाच्या कव्हरचा वापर करा. फोनच्या कडांना आणि मागील बाजूस पुरेसे संरक्षण मिळेल, याची खात्री करा. खिशातील चाव्या, नाणी किंवा इतर वस्तूंमुळे स्क्रीनवर ओरखडे पडू नयेत, यासाठी स्क्रीन प्रोटेक्टर लावा. स्क्रीन प्रोटेक्टर खराब झाल्यास किंवा तुटल्यास तो वेळेवर बदला. योग्य कव्हर आणि स्क्रीन प्रोटेक्टरमुळे फोनचे बाह्य नुकसान टाळण्यास मदत होते. त्यामुळे किरकोळ पडझड किंवा ओरखड्यांमुळे दुरुस्तीचा खर्च करण्याची वेळ कमी येते.
- स्मार्टफोनची नियमित स्वच्छता करा : स्मार्टफोन दिवसभर हातात, खिशात किंवा पिशवीत असतो. त्यामुळे त्यावर धूळ, माती आणि कपड्यांचे बारीक तंतू जमा होतात. विशेषतः चार्जिंग पोर्टमध्ये धूळ किंवा कचरा साचल्यास चार्जर व्यवस्थित जोडला जात नाही. परिणामी फोन चार्ज होण्यास अडचण येऊ शकते किंवा चार्जिंगचा वेग मंदावू शकतो. त्यामुळे फोनची नियमित स्वच्छता करणे आवश्यक आहे. मऊ आणि स्वच्छ कापडाने फोनची स्क्रीन आणि बाह्य भाग पुसावा. चार्जिंग पोर्टमध्ये धूळ साचली आहे का, हे तपासावे. स्वच्छता करताना पाणी किंवा द्रव पदार्थ थेट फोनवर टाकू नयेत. चार्जिंग पोर्ट स्वच्छ करताना धातूच्या वस्तू किंवा टोकदार उपकरणांचा वापर करू नये. फोनच्या स्पीकर आणि मायक्रोफोनच्या छिद्रांमध्ये घाण साचणार नाही, याची काळजी घ्यावी. नियमित स्वच्छतेमुळे फोनच्या विविध भागांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यास मदत होते.
- फोन बदलण्याऐवजी गरजेनुसार बॅटरी बदला : काही वर्षे स्मार्टफोन वापरल्यानंतर त्याची बॅटरी लवकर संपण्याची समस्या निर्माण होते. पूर्वी दिवसभर टिकणारी बॅटरी काही तासांतच संपत असल्यामुळे अनेक जण नवीन फोन खरेदी करण्याचा विचार करतात. मात्र, केवळ बॅटरीची क्षमता कमी झाली म्हणून संपूर्ण स्मार्टफोन बदलण्याची गरज नाही. अशा वेळी अधिकृत सेवा केंद्रात जाऊन बॅटरीची स्थिती तपासून घ्यावी. बॅटरीची क्षमता लक्षणीयरीत्या कमी झाली असल्यास ती बदलण्याचा पर्याय निवडता येतो. शक्यतो संबंधित कंपनीच्या अधिकृत सेवा केंद्रातूनच नवीन बॅटरी बसवून घ्यावी. यामुळे योग्य दर्जाची बॅटरी मिळण्यास आणि सुरक्षिततेची खात्री करण्यास मदत होते.
- सुरक्षा अद्ययावत (सिक्युरिटी अपडेट्स) नियमितपणे तपासा : स्मार्टफोन दीर्घकाळ वापरताना त्याच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. अनेक कंपन्या ठरावीक कालावधीपर्यंतच आपल्या स्मार्टफोनसाठी सॉफ्टवेअर आणि सुरक्षा अद्ययावत उपलब्ध करून देतात. सुरक्षा अद्ययावत न मिळणाऱ्या जुन्या फोनमध्ये नवीन सायबर धोक्यांपासून संरक्षण मिळण्याची क्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे फोनमध्ये उपलब्ध असलेली सुरक्षा अद्ययावत आणि सॉफ्टवेअरची नवीन आवृत्ती वेळोवेळी स्थापित करावी. सध्या काही स्मार्टफोन उत्पादक सात वर्षांपर्यंत सॉफ्टवेअर आणि सुरक्षा अद्ययावत देत आहेत. गुगलच्या पिक्सेल मालिकेतील काही नवीन स्मार्टफोनमध्ये अशा प्रकारचे दीर्घकालीन अद्ययावत समर्थन उपलब्ध आहे. त्यामुळे नवीन स्मार्टफोन खरेदी करताना त्याची किंमत, कॅमेरा आणि बॅटरी यांच्याबरोबरच कंपनी किती वर्षे सॉफ्टवेअर आणि सुरक्षा अद्ययावत देणार आहे, याचीही माहिती घ्यावी.

पंतप्रधान स्वनिधी पुरस्कार २०२६ मध्ये महाराष्ट्राची बाजी; राज्याला ५ राष्ट्रीय पुरस्कार

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– पथविक्रेत्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राबवण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पंतप्रधान स्वनिधी) योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या 'पंतप्रधान स्वनिधी सन्मान पुरस्कार २०२६' सोहळ्यात महाराष्ट्राला २, तर छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि परळी या शहरांना प्रत्येकी १ असे एकूण ५ राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.



केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. केंद्रीय राज्यमंत्री तोखन साहू यावेळी उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त अमोल येडगे यांनी पुरस्कार स्वीकारला.

पुनर्रचित पंतप्रधान स्वनिधी योजनेअंतर्गत पथविक्रेत्यांना कर्ज वितरित करण्याच्या कामगिरीत महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्याच्या बाबतीत राज्याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. कर्ज वितरणाच्या कामगिरीसाठी लोकसंख्येनुसार शहरांची श्रेणी ठरवण्यात आली होती. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगरने १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या गटात तृतीय क्रमांक मिळवला. १ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात परभणीने, तर १ लाखांपेक्षा कमी लोकसंख्येच्या गटात परळीने प्रथम क्रमांक पटकावला.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने झच् स्वनिधी योजनेच्या अंमलबजावणीत निर्धारित उद्दिष्टापेक्षा अधिक कामगिरी केली आहे. शहरासाठी २३,५०२ पथविक्रेत्यांना प्रथम कर्ज देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. प्रत्यक्षात ४७,९५० पथविक्रेत्यांना प्रथम कर्ज वितरित करण्यात आले. त्यामुळे २०४ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली. १७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत शहरातील ६५,०९१ पथविक्रेत्यांना एकूण १००.०५ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. तसेच ३८,६९० पथविक्रेते डिजिटल व्यवहारांसाठी सक्रिय झाले आहेत. या कामगिरीमुळे महापालिकेला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. पंतप्रधान स्वनिधी योजनेची सुरुवात १ जून २०२० रोजी करण्यात आली. या योजनेद्वारे पथविक्रेत्यांना व्यवसायासाठी सुलभ कर्ज उपलब्ध करून दिले जाते. केंद्र सरकारने ऑगस्ट २०२५ मध्ये योजनेची पुनर्रचना करून मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

दोन लाखांवरील रोख व्यवहारांची माहिती आता आयकर विभागाला जाणार, महसूल विभागाचा निर्णय

मुंबई (प्रतिनिधी)– जमीन किंवा मालमत्तेच्या खरेदी-विक्री व्यवहारात दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिल्यास त्याची माहिती आता आयकर विभागाला पाठविली जाणार आहे. यासाठी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या 'आय-सरिता' प्रणालीत बदल करण्यात येणार असून, दस्त नोंदणी करतानाच रोख आणि धनादेशाद्वारे दिलेल्या रकमेची स्वतंत्र नोंद केली जाणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकांना याबाबत आवश्यक कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

मालमत्तेच्या व्यवहारात दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिली किंवा स्वीकारली गेल्यास त्याची माहिती आयकर विभागाला देणे आवश्यक आहे.



सर्वोच्च न्यायालयाने १६ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने तसेच आयकर कायद्यातील तरतुदींनुसार महसूल विभागाने याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचे रोख व्यवहार झालेल्या दस्तांची माहिती दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत आयकर विभागाला पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

माहिती संकलनाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि अचूक करण्यासाठी 'आय-सरिता' प्रणालीत ही सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. दस्त नोंदणीच्या वेळी खरेदीदाराने विक्रेत्याला किती रक्कम रोखीने आणि किती रक्कम धनादेशाद्वारे दिली, याची स्वतंत्र नोंद करता येईल. एका व्यवहारात एकापेक्षा अधिक खरेदीदार किंवा विक्रेते असल्यास प्रत्येक पक्षकाराने दिलेल्या किंवा स्वीकारलेल्या रकमेचाही स्वतंत्र तपशील नोंदविता येणार आहे. या नोंदींच्या आधारे दुय्यम निबंधक कार्यालयांकडून दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत आर्थिक व्यवहारांचा एसएफटी (स्टेटमेंट ऑफ फायनान्शियल ट्रान्झॅक्शन) अहवाल आयकर विभागाला पाठविण्यात येईल. या अहवालात खरेदीदार आणि विक्रेत्याचे नाव, पॅन क्रमांक, व्यवहाराची एकूण रक्कम, रोखीने दिलेली रक्कम, दस्त क्रमांक आणि नोंदणी दिनांक यांचा समावेश असेल.

'एफडीए'ची राज्यभरात मोठी कारवाई; ७ महिन्यांत १५२.६५ कोटींचा अन्नसाठा जप्त, १,६८८ जणांना अटक

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यातील अन्नपदार्थांची गुणवत्ता आणि सुरक्षितता राखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर २०२६ या सात महिन्यांच्या कालावधीत राज्यभरातील अन्न उत्पादन आणि विक्री आस्थापनांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेत तब्बल १५२.६५ कोटी रुपये किमतीचा अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला असून, १,६८८ जणांवर अटकेची कारवाई झाली आहे.

'एफडीए'च्या अन्न विभागाने या सात महिन्यांत राज्यभरातील २५,५१४ आस्थापनांची तपासणी केली. नियमांचे उल्लंघन आढळलेल्या ११,५०६ आस्थापनांना सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या. तसेच १,६५१ परवाने निलंबित करण्यात आले. हॉटेल, रेस्टॉरंट, धाबे आणि क्लब अशा एकूण ६,९८८ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यापैकी ४,४४२ आस्थापनांना



सुधारणा नोटिसा देण्यात आल्या. तर ९३७ परवाने निलंबित आणि २३ परवाने रद्द करण्यात आले.

प्रतिबंधित गुटखा आणि पान मसाल्याची विक्री, वाहतूक व वितरण करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने विशेष कारवाई केली. या प्रकरणांत १,३०४ गुन्हे दाखल करून १,६२९ आरोपींना अटक करण्यात आली. या कारवाईत ४१.९४ कोटी रुपये किमतीचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. तसेच १७ कोटी रुपये किमतीची २०७ वाहनेही जप्त करण्यात आली. खाद्यतेलाच्या १,५६७ नमुन्यांच्या तपासणीदरम्यान २७.६० कोटी रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला. मसाल्यांच्या १,७६४ नमुन्यांच्या तपासणीत २२.३४ कोटी रुपये किमतीचा माल जप्त झाला. दुधाचे ५,११४ नमुने तपासण्यात आले असून, या कारवाईत १३.३७ कोटी रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला. याशिवाय आंबे, लाडू, खवा, बेकरी उत्पादने, गूळ, तूप आणि आईस्क्रीम यांसारख्या खाद्यपदार्थांवरही धाडी टाकण्यात आल्या. यात ४७.३९ कोटी रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला.

अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या कलम ४७ अन्वये एकूण १८,२१५ अंमलबजावणी नमुने संकलित करण्यात आले. त्यापैकी ६,८३३ नमुने प्रमाणित आढळले. तर ५६७ नमुने कमी दर्जाचे, २४३ नमुने चुकीच्या नाममुद्रेचे आणि ३९८ नमुने असुरक्षित असल्याचे तपासणीत समोर आले. या प्रकरणांमध्ये १८४ परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

सैनिकी शाळांतील प्रवेश आता केवळ गुणवत्तेच्या आधारेच; मुख्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यातील सैनिकी शाळांमध्ये पारदर्शक, उत्तरदायी आणि गुणवत्तापूर्ण व्यवस्था निर्माण करण्यावर नव्या धोरणात भर दिला जावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. गुणवत्ताधारित प्रवेश प्रक्रिया अधिक मजबूत करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना प्रोत्साहन दिले जाईल, तर कामगिरीत पिछाडीवर असलेल्या शाळांवर आवश्यकतेनुसार कठोर प्रशासकीय कारवाई केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

'वर्षा' निवासस्थानी त्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सैनिकी शाळा मूल्यांकन व सक्षमीकरण आराखडा तसेच सुधारीकरण धोरण समितीच्या अहवालासंदर्भात आयोजित बैठकीत



ते बोलत होते. बैठकीत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक मंगेश जोशी, यशदा, पुणे येथील उपमहासंचालक हेमंत वसेकर, सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नागपूरचे शैलेश जोगळेकर, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथील डॉ. अजय फुंदे तसेच समितीचे सदस्य व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, समितीने सादर केलेल्या अहवालातील बहुतांश शिफारशी योग्य असून संबंधित विभागांनी त्यावर आवश्यक कार्यवाही करावी. यासाठी अन्य विभागांशी समन्वय साधून निर्णय घ्यावेत. सैनिकी शाळांच्या कामकाजाचा वर्षातून एकदा आढावा घेऊन शिफारशींच्या अंमलबजावणीची प्रगती तपासावी. 'अ' वर्गातील सैनिकी शाळांना त्यांच्या कामगिरीबाबत प्रोत्साहन देवून 'ब' श्रेणीतील शाळांना 'अ' वर्गात येण्यासाठी प्रोत्साहन देणे, 'क' आणि 'ड' श्रेणीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.आवश्यक ती कठोर कार्यवाही करावी असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील सैनिकी शाळांची शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्ता उंचावण्याबरोबरच पायाभूत सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सैनिकी प्रशिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी हा आराखडा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी तसेच संरक्षण दलांमध्ये अधिकारी म्हणून अधिकाधिक विद्यार्थी दाखल व्हावेत, या उद्देशाने सैनिकी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्था निर्माण करण्यावर या धोरणात भर देण्यात यावा असे निर्देशही त्यांनी दिले.

BEFORE THE HON'BLE DEPUTY REGISTRAR OF CHITS/ARBITRATOR

AT NIZAMABAD

I.A.No. 134 OF 2026.
IN
ARB No. 77 OF 2026

Between:

Amruthaditya Chit Fund Pvt. Ltd. Bodhan-Br., Nizamabad Dist. Rep. By Its ForemanM.Raghavendra. ..Disputant

AND

Swami Tryambak Govindappa & others ..Opponent

NOTICE

To,

1. Swami Tryambak Govindappa S/o. Govindappa Gangayappa Swami, aged about 47 years, Occ Primary Teacher, ZPPS Manjram. R/o H.No.122, Swami Niwas, Naigaon, Mukhed TQ, Nanded Dist.431722. Cell No.7798361650.
2. Balaji Vishwanath Rao Amruthwar, S/o. Vishwanath Vittal Rao Amruthwar, aged about 53 years, Occ: Head Master, ZPPS Manjram, R/o.H.No.Bhrugu Nivas, Barhali Road, Satyasai Nagar, Umardari Post, Nanded Dist.431715, Cell No.7758859457
3. Sarika Gangadhar Swami S/o. Gangadhar Vishwanath Swami, aged about 41 years, Occ: Primary Teacher, ZPHS Manjram, At Present Chitmogra. R/o Wangi Road, Handko Colony, Parbhani Dist.431401 Cell No.8806919175
4. Ramesh Gopal Rao Tarfewad S/o.Gopal Rao Tarfewad , aged about 53 years, Occ: Head Master ZPPS Manjramwadi, R/o Tarfewad Niwad, Shivaji Nagar, Mukhed, Nanded Dist.431715. Cell No.8698184916

Take notice that the above Dispute is filed against you and others for recovery of money. Summons were issued to you. But you have failed to receive the same. The above dispute is posted on **25-11-2026** for your appearance. On that day you have to appear in person at **11:00 AM** before the Deputy Registrar referred above. otherwise, the case will be decided ex-parte.

Sd/- Deputy Registrar of
Chits/Arbitrator Nizamabad.

महावितरणची राज्यभरात कारवाई, ३ दिवसांत २५० वीजचोरीची प्रकरणे उघड, ६.२७ कोटींचा गैरवापर उघड

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यात वीजचोरी आणि अनधिकृत वीज वापराविरोधात महावितरणने विशेष मोहीम राबवली आहे. या मोहिमेत अवघ्या ३ दिवसांत वीजचोरीची २५० प्रकरणे उघडकीस आली आहेत. या कारवाईत एकूण ६ कोटी २७ लाख रुपयांच्या वीजचोरीचा पर्दाफाश झाल्याची माहिती महावितरणने दिली आहे. सुरक्षा आणि अंमलबजावणी विभागाच्या भरारी पथकांनी राज्यातील विविध भागांत तपासणी करून ही कारवाई केली.

महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाने कोकण, पुणे, नागपूर आणि छत्रपती



संभाजीनगर या चार प्रादेशिक विभागांत तपासणी केली. त्यामध्ये सर्वाधिक ७३ प्रकरणे पुणे विभागात आढळली. तर इतर विभागांतील कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. कोकण विभाग ५३ प्रकरणे, पुणे विभाग ७३ प्रकरणे, छत्रपती संभाजीनगर विभाग ५६ प्रकरणे, नागपूर विभाग ६८ प्रकरणे, या सर्व प्रकरणांचे मूल्यांकन करण्यात आले असून संबंधित ग्राहकांना ६ कोटी २७ लाख रुपयांची वीजचोरीची बिले देण्यात आली आहेत. निर्धारित मुदतीत बिल आणि दंडाची रक्कम न भरल्यास संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या मोहिमेत २४० ग्राहकांविरुद्ध विद्युत कायदा २००३ मधील कलम १३५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. हे कलम वीजचोरीशी संबंधित आहे. तर अनधिकृत वीज वापराच्या २ प्रकरणांत कलम १२६ नुसार कारवाई करण्यात आली आहे. वीजचोरीचे बिल आणि दंडाची रक्कम विहित मुदतीत न भरणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी फिर्याद दिली जाणार आहे.

IBPS PO मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर; ७,५६५ पदांसाठी भरती, पात्र उमेदवारांना मुलाखतीची संधी

मुंबई (प्रतिनिधी)– बँकिंग क्षेत्रात नोकरीच्या शोधात असलेल्या उमेदवारांसाठी महत्त्वाची बातमी आहे. इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शनने प्रोबेशनरी ऑफिसर मुख्य परीक्षेचा निकाल २० नोव्हेंबर २०२६ रोजी जाहीर केला आहे. ४ ऑक्टोबर रोजी ही परीक्षा झाली होती. परीक्षेला बसलेले उमेदवार आता **IBPS** च्या अधिकृत वेबसाइटवर आपला निकाल तपासू शकतात.

IBPS PO/MT-XVI भरती प्रक्रियेद्वारे सहभागी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील प्रोबेशनरी ऑफिसर आणि मॅनेजमेंट ट्रेनीची एकूण ७,५६५ पदे भरली जाणार आहेत. मुख्य परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रियेच्या पुढील टप्प्यात म्हणजेच मुलाखतीसाठी संधी मिळणार आहे. मुलाखतीसंदर्भातील वेळापत्रक आणि पुढील सूचना **IBPS** कडून अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केल्या जातील.

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



Change In Name

My old name is **MOHOMAMAD ATEEQ ULLA MOHOMMAD WAHEEDULLA SHAIKH** which I am changing as New name **MOHAMMED ATEEQ ULLA MOHAMMED WAHEED ULLA.** Henceforth my all corespondence will be done as per my new name. Please consider the same.

ADDRESS - H NO. 70-0, DARGAPURA, TATLUKA KANDHAR, Kandhar, DIST: Nanded, Maharashtra - 431714

जाहीर प्रगटन

माझे पक्षकार १) श्री. शिवाजी गणपतराव साहु, २) श्री. भगवान पि.गणपतराव साहु दोघे रा. विठ्ठलवाडी, गुरुद्वारा गेट नं. १, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकाराने सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार वरील प्रमाणे राहणारे असुन, त्यांची विठ्ठलवाडी गुरुद्वारा गेट नं. १, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकाराने सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार वरील प्रमाणे राहणारे असुन, त्यांची विठ्ठलवाडी गुरुद्वारा गेट नं. १, नांदेड येथील सिटीएस नं. १९२१, १९२२ ज्याचा म.न.पा. घर क्र.३-६-४२७, आणि ३६-४२८असा असुन पिन क्र. ४०४०३०३७२४ असा असुन सदर घराचे माझे पक्षकार मालक व कब्जेदार आहेत. सदर घरात माझे पक्षकार त्यांच्या पत्नीसह राहतात. माझे पक्षकार मालक व कब्जेदार आहेत. सदर घरात माझे पक्षकार त्यांच्या पत्नीसह राहतात. माझे पक्षकारांना त्यांच्या लग्न संबंधातुन कोणतेही मुलबाळ झाले नाही. त्यामुळे ते त्यांच्या पत्नीसह एकटेच राहतात, त्याचा गैरफायदा घेवुन माझ्या पक्षकाराचे भाचे गजानन सुभाषराव भोसीकर रा. चैतन्य नगर नांदेड यांनी माझे पक्षकाराचा विश्वास संपादन केला त्याच्या नात्याच्या संबंधाचा गैरफायदा घेवुन माझ्या पक्षकाराची दिशाभुल करुन त्याच्या वरील मालमत्तेचे बक्षिसपत्र त्यांच्या हक्कात करुन घेतले, जेंव्हा माझ्या पक्षकारास ही बाब समजली तेंव्हा माझ्या पक्षकारांनी गजानन भोसीकर यांना या बाबत जाब विचारला व सदरचे बक्षिसपत्र रद्द करण्याबाबत सांगीतले. तेंव्हा गजानन भोसीकर यांनी उडवा उडवीचे कारणे दिली व आज उदया बक्षिसपत्र रद्द करतो असे खोटे आश्वासने दिली व सदरचे खोटे बक्षिसपत्र रद्द केले नाही. त्यामुळे माझ्या पक्षकाराने सदरचे खोटे व दिशाभुल करुन घेतलेले बक्षिसपत्र रद्द करण्यासाठी मा. दिवाणी न्यायालय नांदेड यांच्या न्यायालयात दिवाणी दावा क्र. ३२२ / २०२५ दाखल केला आहे. उपरोक्त घर हे माझे व माझ्या पक्षकाराच्या पत्नीस राहण्याचा एकमेव निवारा आहे. तसेच उपरोक्त मालमत्ता ही आमचे पक्षकारांची वडीलोपार्जीत मालमत्ता असुन, माझे पक्षकाराचे वडील गणपतराव विठ्ठलराव साहु यांनी त्यांच्या हयातीत उपरोक्त मालमत्तेचे कौटुंबीक व्यवस्थेत सदर मालमत्ता ही त्यांच्या वारसांना उपभोगण्या कामी दिली होती व सदरची मालमत्ता ही एक दुसऱ्यांना विचारणा केल्याशिवाय दुसऱ्या कोणासही विक्री करु नये व सह मालमत्ता धारकाने सदर मालमत्ता विकत घेण्यास असमर्थता दाखविल्यासच व त्याच्या संमतीविना दुसऱ्यास विक्री करु नये असे ठरवले होते. परंतु माझ्या पक्षकारास खात्रीलायक रित्या समजले आहे की, गजानन भोसीकर यांनी माझ्या पक्षकाराचे दुसरे भाऊ व सह भागधारकास हातमिळवणी करुन, कट कारस्थान करुन सदरचे घर त्यांच्या नावे असल्याचा गैरफायदा घेवुन माझ्या पक्षकाराचे घर दुसऱ्यास विक्री करण्याच्या प्रयत्नात असुन, त्या बनावट बक्षिसपत्राचा गैरफायदा घेवुन खरेदीदारास सदरचे घर व दुकान विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास माझे पक्षकार व त्याच्या पत्नीस रस्त्यावर यावे लागेल. त्यामुळे सर्व जनतेस या जाहीर प्रगटाद्वारे सुचित करण्यात येते की, वर वर्णनीत विठ्ठलवाडी, गुरुद्वारा गेट नं. १, येथील सिटीएस क्र. १९२१, १९२२ ज्याचा म.न.पा. घर क्र. ३ ६ ४२७, आणि ३-६- ४२८असा गजानन सुभाषराव भोसीकर, रेखा गणपतराव साहु, राजकुमार गणपतराव साहु यांच्यापासुन खरेदी करण्याचा व्यवहार कोणीही करु नये, तसे केल्यास सदरचा व्यवहार माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व व्यवहार करणाऱ्यास दिवाणी व फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन.

मार्फत, ॲड. एस. एस. देशमुख, नांदेड

जाहीर प्रगटन देणार
१) श्री. शिवाजी गणपतराव साहु
२) श्री. भगवान पि. गणपतराव साहु
दोघे रा. विठ्ठलवाडी, गुरुद्वारा गेट नं. १, नांदेड

जाहीर प्रगटन

सिंधु नागनाथ मुसळे वय ४३ वर्षे धंदा घरकाम रा. एस. आर. पी. कॉटर, हिंगोली ता.जि. हिंगोली,

लिहुन घेणार-पुजा रामकिशन चव्हाण वय ३० वर्षे धंदा घरकाम रा.जुना लोहा ता लोहा जि नांदेड

कारणे सौदा चिठ्ठी करारनामा लिहून देतो की, दस्त क्र ५९१/२०२३ नुसार आमच्या मालकी ताब्यातील कब्जातील मौजे आसदवन ता.जि. नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील शेत गट नंबर १२८ पैकी निर्मल विहार मधील एक प्लॉट ज्याचे प्लॉट नंबर २० आहे. जो गुंठेवारी झालेला आहे ज्याची एकूण लांबी पुर्व पश्चिम ६० फुट म्हणजे १८.२८ मी आहे व रुंदी दक्षिण उत्तर ४० फुट म्हणजे १२.१९ मी आहे म्हणजे १४५३ चौरस फुट ज्याचे एकूण क्षेत्रफळ २४०० चौ फुट म्हणजे २२३.०४ चौ मीटर असून ज्याची

चतु: सिमा -

पूर्वेस पश्चिमेस -शेत गट नंबर १२८ आहे. पश्चिमेस -३० फुट रुंद रोड आहे. दक्षिणेस,प्लॉट नंबर २१ आहे. ऊतरेस,प्लॉट नंबर १९ आहे.

वरील चतु: सिमेच्या आतील प्लॉट लिहून घेणार यांना आंतरीक व बाह्य हक्कासह सदरील रक्कमेची तुम्हास वेगळी पावती दिली नसून सौदा चिठीलाच पावती ग्राहय धरण्यात येईल. उर्वरीत रक्कम रुपये हे दिनांक २५-०२-२०२७ रोजी रजिस्ट्रीच्या वेळेस देण्याचे ठरले आहे ,रजिस्ट्री लिहून घेणार यांच्या नावे किंवा ते सांगतील त्या व्यक्तीच्या नावे करुन देण्यात येईल. रजिस्ट्री चा संपूर्ण खर्च लिहून घेणार यांना करावा लागेल.

गहाणखत, विक्रीखत, सदर प्लॉट मी इतर कोणास कोणत्याही प्रकारे यापूर्वी सौदा चिट्टी करारनामा करुन दिलेले नाही सदर प्लॉटवर यापुरवी शासकिय व निम शासकिय कर्ज बोजा नाही. तसे काही निघाल्यास त्याची सर्व जवाबदारी लिहन देणार यांच्यावर राहील,सबब सौदा चिट्ठी करारनामा कोणाच्याही दबाव अथवा दडपणाखाली न येता माझ्या राजीखुशीने सौदा चिड्डी करारनामा आज रोजी करुन देत आहे सदरील मजकुर वाचून समजून पंचा समक्ष सही/ अंगठा केला आहे. करीता सबब सौदा चिट्ठी योग्य वेळी सनद म्हणून कामी यावे करीता सौदा चिठ्ठी.

यासबंधी कोणाच्या आक्षेप असल्यास पंधरा दिवसांच्या आत प्रत्यक्ष भेटून सादर करावा अन्यथा आक्षेप ग्राह्य धरला जाणार आहे.

लिहुन घेणार
पुजा रामकिशन चोहाण
रा.लोहा जिल्हा नांदेड मोबाईल ८८३०४०७३३९

जाहीरप्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्या. क. स्तर भोकर यांच्या न्यायालयात
समक्ष श्री. आर.एस. इरले साहेब सह. दि. न्यायालय क. स्तर, भोकर.
किरकोळ अर्ज क्र. ३१३/२०२६

१) अमोल पि. गणेश कांबळे
वय- ३४ धंदा- शिक्षण
२) संदीप पि. गणेश कांबळे
वय- ३९ धंदा- नौकरी
३) लताबाई भ्र. गणेश कांबळे
वय- ५४ धंदा- घरकाम
सर्व रा. भोसी, ता. भोकर, जि. नांदेड.
४) कल्पना भ्र. शाम खंदारे
वय- ३३ धंदा- घरकाम
रा. काकाद्दती, ता. पुसद, जि. यवतमाळ.
५) रत्नामाला भ्र. निखील पाईकराव
वय- ३२ धंदा- घरकाम
रा. वांगी रोड, अंबिका नगर, परभणी, ता. जि. परभणी.

विरुध्द

निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत गणेश पि. तुकाराम कांबळे यांचे वारस आहेत. मयत गणेश पि. तुकाराम कांबळे यांचा मृत्यू दिनांक १९.०९.२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक २२/१२/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक १९/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकर.

स.अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकर.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

डॉ. अभय पवार यांची वसमतच्या बाळासाहेब ठाकरे हरिद्रा केंद्रावर 'टेक्निकल एक्सपर्ट' म्हणून नियुक्ती

मंत्री हेमंत पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

नांदेड (प्रतिनिधी)– बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र, वसमत, जि. हिंगोली येथे तांत्रिक तज्ज्ञ म्हणून डॉ. अभय आनंदराव पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



डॉ. अभय पवार यांच्या दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने व त्यानंतर झालेल्या तांत्रिक मूल्यमापन मुलाखतीमधील कामगिरीच्या आधारे ही नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. पवार यांचे नियुक्तीपत्र हेमंत पाटील (कॅबिनेट मंत्री दर्जा) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या नियुक्तीनंतर डॉ. पवार हे संस्थेच्या संशोधन कार्यपद्धती, प्रगत हळद प्रक्रिया तंत्रज्ञान व तांत्रिक नियोजनामध्ये मार्गदर्शन करणार आहेत. तसेच शेती व प्रक्रिया क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी आणि आव्हानांवर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी व्यवस्थापनास तांत्रिक सहकार्य करणार आहेत.

डॉ. अभय आनंदराव पवार हे माजी प्राचार्य, डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस, आंबी, पुणे असून सध्या प्रोफेसर, आयसीएम टेक्निकल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक व तांत्रिक अनुभवाचा फायदा आता वसमतच्या हळद संशोधन केंद्राला आणि परिसरातील हळद उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे. या नियुक्तीमुळे हळद संशोधन, प्रक्रिया आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मतदार यादी पुनरीक्षणाची मोहीम ३० नोव्हेंबरपर्यंत

२२ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार

नांदेड (प्रतिनिधी)– भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ (SIR) च्या वेळापत्रकात सुधारणा करण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करण्यात येणार असून, २२ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. या प्रक्रियेत सर्व राजकीय पक्ष, नागरिक आणि पात्र मतदारांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन ०८६ नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी हणमंत कोळेकर यांनी केले आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत १८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्यामार्फत पहिल्या टप्प्यात मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या मतदारांच्या घरी भेट देऊन गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करण्यात येणार आहे. प्राप्त गणना प्रपत्रांचे संगणकीकरण करण्याची अंतिम मुदत १० डिसेंबर २०२६ आहे. तसेच नोटीस टप्पा, दावे व हरकतींचा निपटारा ३१ ऑगस्ट ते १५ डिसेंबर २०२६ या कालावधीत करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी २२ डिसेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होईल.

या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील प्रमुख राजकीय



पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात आली. यावेळी राजकीय पक्षांनी कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी करून मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे १९ नोव्हेंबर रोजी प्रशिक्षण घेण्यात आले. त्यांना गणना प्रपत्रे, सूचनापत्रे आणि SDD मतदारांची यादी देऊन कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बीएलओमार्फत संबंधित मतदारांना गणना प्रपत्र व आवश्यक सूचना वितरित करण्यात येतील. ज्या मतदारांकडे व्हॉट्सअप सुविधा उपलब्ध आहे, त्यांना पूर्ण भरलेल्या गणना प्रपत्राची प्रत व्हॉट्सअपद्वारे पाठविण्यात येईल. व्हॉट्सअप सुविधा नसलेल्या मतदारांना स्वतंत्र पोचपावती देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व पात्र मतदारांनी बीएलओंना आवश्यक सहकार्य करून आपली माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी हणमंत कोळेकर व सहायक मतदार नोंदणी अधिकारी इंद्रजित गरड यांनी केले आहे.

नांदेड जिल्ह्यातील ५ हजार ७६१ शेतकरी ओटीएस कर्जमुक्तीसाठी पात्र

नांदेड (प्रतिनिधी)– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत एकवेळ समझोता घटकासाठी नांदेड जिल्ह्यातील ५ हजार ७६१ पात्र शेतकऱ्यांची यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची दोन लाख रुपयांवरील रक्कम संबंधित बँकेत जमा केल्यानंतर त्यांना शासनामार्फत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. या याद्या संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना सुरू केली असून, कर्जमाफी, एकवेळ समझोता आणि प्रोत्साहन असे तीन घटक आहेत. पहिल्या टप्प्यातील कर्जमाफी घटकांतर्गत नांदेड जिल्ह्यातील २ लाख २ हजार ७३ पात्र शेतकऱ्यांच्या याद्या आतापर्यंत प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. यापैकी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या १ लाख ५७ हजार १२८ शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये १ हजार ४१६ कोटी ४० लाख रुपयांची कर्जमुक्ती करण्यात आली आहे.

एकवेळ समझोता घटकासाठी प्रसिद्ध केलेल्या यादीत शेतकऱ्यांचे नाव, विशिष्ट क्रमांक, आधार क्रमांक, बँक व शाखेचे नाव, कर्जखाते क्रमांक, ३१ मार्च २०२६ अखेरची थकबाकी, ओटीएसनुसार थकबाकी, शेतकऱ्याने भरावयाची रक्कम आणि शासनामार्फत देय असलेली रक्कम यांचा तपशील नमूद आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीतील माहिती तपासून आपला हिस्सा संबंधित बँकेत जमा करावा. एकाच बँकेत एकापेक्षा अधिक कर्जखाती असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची रक्कम कोणत्याही एका कर्जखात्यात भरण्याची सुविधा आहे. मात्र, संबंधित खात्यासाठी ओटीएस अंतर्गत निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम जमा करू नये. याबाबत शेतकऱ्यांनी बँक अधिकाऱ्यांकडून आवश्यक मार्गदर्शन घ्यावे.

शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची रक्कम भरण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२७ आहे. बँकांकडून दर शुक्रवारी भरणा केलेल्या रकमेची माहिती पोर्टलवर अद्ययावत करण्यात येणार आहे. त्यानंतर महा आयटीमार्फत रकमेची पडताळणी केली जाईल. थकबाकी अद्ययावत झाल्यानंतर तीन दिवसांनी आधार प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध होईल. यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी आवश्यक असून, ॲग्रीस्टॅक नोंदणी व आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या पात्र शेतकऱ्यांना निकषांनुसार आणि त्यांच्या हिश्श्याची रक्कम भरल्यानंतर दोन लाख रुपयांचा लाभ वितरित करण्यात येईल. शासनाची रक्कम कर्जखात्यात जमा झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होईल.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची मोहनराव हंबर्डे यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– कंधार येथील विविध विकास कामांच्या लोकार्पण सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार नांदेड दौऱ्यावर आले असता त्यांनी माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या कौठा स्थित जनसंपर्क कार्यालयास भेट दिली. या भेटीदरम्यान मोहनराव हंबर्डे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी मोहनराव हंबर्डे यांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला.

दादांच्या उपस्थितीत मोहनराव हंबर्डे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



केल्यानंतर दादांनी हंबर्डे यांना राजकीय पुनर्वसनाबाबत शब्द दिला होता. हाच धागा पकडून सुनेत्रा पवार यांनी त्यांचा शब्द आम्ही पाळू, असे आश्वासन दिले. याप्रसंगी सुनेत्रा पवार यांचे जनसंपर्क कार्यालयात जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी, राज्य मंत्री बाबासाहेब पाटील, आ. प्रताप पाटील चिखलीकर. धारोजी हंबर्डे. मिनलताई खतगावकर, राहुल हंबर्डे.आशाताई शिंदे, नरसिंग हंबर्डे, जयसिंग हंबर्डे, बळवंत हंबर्डे, हर्षे हंबर्डे, रोहित हंबर्डे, शिवप्रसाद कुबडे, दत्ता हंबर्डे आदींची उपस्थिती होती.

सिडको क्षेत्रीय कार्यालयात वसुलीसाठी फक्त दोन पर्यवेक्षक व दहा वसुली लिपीक

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– नांवामनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दोन प्रभागातील जवळपास तीस हजार मालमत्ताधारकांच्या वसुलीसाठी केवळ दोन पर्यवेक्षक व दहा वसुली लिपीक कार्यरत आहेत. जवळपास पंचवीस कोटी वसुली आहे. त्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ताण असून, मनपा प्रशासनाने तत्काळ पर्यवेक्षक व वसुली लिपिकांची नेमणूक करून वसुलीसाठी प्राधान्य देण्याची मागणी होत आहे.

नांवामनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १९ व २० मधील जवळपास तीस हजार मालमत्ताधारकांचा समावेश असून, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मालमत्ता कर, थकबाकी व चालू असा पाणीपुरवठा कर व मालमत्ता जवळपास पंचेविस कोटी रुपये थकबाकी आहे. ही वसुली करण्यासाठी केवळ दोन पर्यवेक्षक व दहा वसुली लिपीक कार्यरत आहेत.

क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १९ मधील जुना कौठा, नवीन कौठा, असरजन, वसरणी, भीमवाडी, शक्तीनगर, संभाजीनगरसह अन्य परिसरातील विविध भाग तर प्रभाग क्रमांक २० मध्ये सिडको, हडको, सिडको मोंढा प्रकल्प, वाघाळा, असदवन, शाहुनगर, राहुलनगर, लहुजी नगर यांसह विविध भागांचा समावेश आहे. हा परिसर झपाट्याने वाढत असून, अनेक ठिकाणी मोकळे भूखंड व अपार्टमेंट, मोठं मोठ्या ईमारती, मंगल कार्यालये, बँकेट हॉल, शैक्षणिक संस्था अंतर्गत शाळा-महाविद्यालय, शासकीय कार्यालये यासह बांधकाम मोठ्या प्रमाणात झाल्याने मालमत्ता कर वाढत गेला, परंतु करपर्यवेक्षक व वसुली लिपिकांच्या कमतरतेमुळे कर वसुली होत नाही.

मुक्या जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्यास अटक

२५ जनावरांसह २२.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– म्हैस वर्गीय जातीच्या जनावरांची अवैध व क्रूरपणे वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून वाहनासह २२.५० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस स्टेशन नायगाव यांनी ही धडाकेबाज कारवाई केली आहे.

नांदेड जिल्ह्यात गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन नायगाव येथील पोलीस पथकाने म्हैस जातीच्या जनावरांची अवैध व क्रूरपणे वाहतूक करणारे वाहन पकडून कारवाई करून २५ म्हैस जातीच्या (वगार व हलगट) जनावरांची सुटका करण्यात आली आहे. दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रभारी अधिकारी, नायगाव पोलीस स्टेशन यांना गोपनीय माहिती मिळाली की, नायगाव ते नरसी जाणाऱ्या रोडवर वाहनातून म्हैस जातीच्या जनावरांची बेकायदेशीर वाहतूक होत आहे. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने नमूद ठिकाणी सापळा रचला.

सापळा रचलेल्या ठिकाणी संशयित आयचर कंपनीचे वाहन येताच अडवून पंचांसमक्ष झडती घेतली असता, वाहनामध्ये जनावरांना निर्दयतेने दोरीने बांधून वाहतूक केली जात असलेली २५ म्हैस जातीची जनावरे मिळून आली. पोलीस पथकाने पंचासमक्ष आयचर कंपनीचे वाहन (क्रमांक **MH-20 GC-7961**) – किंमत अंदाजे रु. २० लाख, २५ म्हैस जातीची जनावरे अडीच लाख रुपये (वगार व हलगट) असा एकूण २२ लाख ५० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाईत आरोपी शेख आवेश शेख रहीम, वय ३३ वर्षे, व्यवसाय – चालक, रा. हिदायतनगर, वाळूज, जि. छत्रपती संभाजीनगर, मोहम्मद इम्रान मोहम्मद मदार कुरेशी, वय ३० वर्षे, रा. रुद्रूर, निझामाबाद यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे नायगाव येथे गुन्हा रजि. नंबर २५५/२०२६, कलम ११ (१) (ड) प्राण्यांना क्रूरतेने वागणूक प्रतिबंध कायदासह कलम ३(५) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई एसपी डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक संदीप जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेश माळी, पो. उपनि. देगलूरकर व पोलीस अंमलदार पांचाळ, पवार यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

तोतया पोलिसास एलसीबीकडून अटक



नांदेड (प्रतिनिधी)– बनावट LCB पोलीस असल्याचे भासवून पैशांची मागणी करणाऱ्या तोतया पोलिसास स्थानिक गुन्हे शाखा, नांदेडच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून १३ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

दि. १८ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी उपविभाग धर्माबाद व बिलोली परिसरात गस्तीवर असताना पथकाला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, बसस्थानक रोड, उमरी येथे एक इसम संशयास्पदरीत्या थांबलेला असून तो काहीतरी गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत आहे. सदर पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचून त्यास शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव बालाजी पंडु कांबळे, रा. शेळ्ळाळ, ता. उदगीर, जि. लातूर असे सांगितले.

मारोती पावडे यांचे निधन



नांदेड (प्रतिनिधी)– शहरातील पावडेवाडी नाका येथील रहिवासी तथा प्रतिष्ठित व्यावसायिक मारोती नारायणराव पावडे (वय ४६) यांचे गुरुवारी (दि. १९) रात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (दि. २०) गोवर्धनघाट येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, पाच बहिणी, एक भाऊ, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

नरेंद्र स्वामी पादुका दर्शन सोहळ्यात अडीच तोळे सोन्याचे लॉकेट चोरट्यांनी पळविले

भोकर (प्रतिनिधी)– भोकर येथे आयोजित स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या पादुका दर्शन कार्यक्रमात झालेल्या गर्दीमध्ये महिलेच्या गळ्यातील अडीच तोळे सोन्याचे लॉकेट अज्ञात चोरट्यांनी पळविल्याची फिर्याद भोकर पोलिसांत देण्यात आली आहे.

निवृत्त शिक्षक कामाजी गंगाराम पेनलोड रा. कांडली यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, १८ नोव्हेंबर रोजी भोकर शहरात स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या पादुका दर्शन कार्यक्रमानिमित्त भोकरला आलो असता माझी पत्नी कृष्णाबाई कामाजी पेनलड हिच्या गळ्यातील अडीच तोळे सोन्याचे लॉकेट हनुमान नगर येथील मैदानात गर्दीमध्ये कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेऊन चोरून नेले. आम्ही शोध घेतला मात्र सदर लॉकेट मिळून आले नाही अशी फिर्याद देण्यात आली. याप्रकरणी भोकर पोलिसात अद्याप गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

गंगाबाई झाडे यांचे निधन

भोकर (प्रतिनिधी)– बोरवाडी येथील गंगाबाई रामजी झाडे (वय ७५) यांचे शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्या गेल्या काही दिवसांपासून आजारी होत्या.



त्यांच्या पार्थिवावर शनिवार दि. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता बोरवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात लोभाजी व रामचंद्र ही दोन मुले, तीन सुना, तीन मुली, जावई, नातवंडे व पणतवंडे असा परिवार आहे.

पिंपळगाव म. येथील ग्रामस्थांचा आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते भाजपात प्रवेश

अर्धापूर (प्रतिनिधी) – आ. श्रीजयाताई अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पिंपळगाव म. येथील विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपात जाहीर पक्ष प्रवेश केला.

यावेळी भाजप तालुकाध्यक्ष बालाजीराव पाटील गव्हाणे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणकर, संचालक निळकंठ मदने, उद्योजक प्रमोद कल्याणकर, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, वसंतराव कल्याणकर, सुभाष कल्याणकर, ईश्वर कपाटे, हेमंत कल्याणकर आदी उपस्थित होते.



पिंपळगाव म. येथील पदाधिकारी जगन कल्याणकर, माजी उपसरपंच उद्धवराव कल्याणकर, माजी सरपंच कपील दुधमल, माजी उपसरपंच आनंदराव कल्याणकर, कैलास कल्याणकर, रामराव कल्याणकर, जळबाजी कल्याणकर, बाबुराव कल्याणकर यांच्यासह विविध पक्षांच्या ६० पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या गळ्यात आ. श्रीजयाताई चव्हाण यांनी भाजपाची दस्ती घालून त्यांचे स्वागत केले आहे. यावेळी सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरुराज रणखांब, राजाराम पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

आज गर्भ या नाटकाचे सादरीकरण होणार आहे

नांदेड (प्रतिनिधी)– महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला गुरुवार, दि. १९ नोव्हेंबरपासून नांदेड येथे सुरुवात झाली. या स्पर्धेच्या माध्यमातून नांदेडकर रसिकांना पहिल्याच दिवशी अस्तोदय या नाटकाच्या माध्यमातून मानवी जीवनासाठी आवश्यक असलेल्या देहदानाचा संदेश नाटकाच्या माध्यमातून देण्यात आला.

महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेला अधोरेखित करणाऱ्या महाराष्ट्र राज्य गीताने कार्यक्रमाची



सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी अखिल भारतीय नाट्य परिषद नांदेड केंद्राच्या अध्यक्षा सौ. अपर्णा नेरलकर, ज्येष्ठ रंगकर्मी तथा नाट्य दिग्दर्शक रवी श्यामराज, लेखक तथा रंगकर्मी सुहास देशपांडे, परीक्षक दिलीप देवरणकर, महेंद्र कुरधोडे आणि सौ. विजया कुडव यांची उद्घाटक म्हणून उपस्थिती लाभली होती. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व नटराजाचे पूजन करून शासनातर्फे सर्व मान्यवरांचे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.

ज्येष्ठ रंगकर्मी रवी श्यामराज यांनी आपल्या मनोगतामध्ये नाटक ही केवळ एक कला नसून महाराष्ट्राला लौकिक प्राप्त करून देणारी दीर्घ परंपरा आहे, असे नमूद केले. तसेच महाराष्ट्र शासन आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय याचे सातत्याने दर्जेदार आयोजन करून नवीन कलाकार तथा रंगकर्मी घडविण्यास स्पर्धेच्या माध्यमातून जे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे ही बाब प्रशंसनीय आहे असे मत व्यक्त केले.

मान्यवरांच्या मनोगतानंतर लगेचच राज्य नाट्य स्पर्धेतील अस्तोदय या पहिल्या नाटकाला सुरुवात करण्यात आली.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com